# प्रकरण चार

## शिक्षण विभाग

### 4.48 डहाणू तालुक्यातील शाळांना ई-लर्निंग साहित्य पुरवठा करणे.

**पंचायत समिती डहाणू, जिल्हा पालघर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 19) -** पंचायत समिती सेस मधून शिक्षण विभागाने शाळांसाठी खरेदी केलेल्या ई-लर्निंग साहित्य पुरवठ्यावर प्रमाणक क्रमांक 3, दिनांक 31/03/2016 अन्वये रक्कम रुपये 9,99,988/- खर्च केलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासनाने दरकरार केलेल्या पुरवठादाराकडून खरेदी केलेली नाही.

2) ई-लर्निंग साहित्य पुरवठा केलेल्या चलनावर दिनांक नमूद केलेला नाही. तसेच साठा नोंदवहीला नोंद घेऊन वाटप केल्याची नोंद ठेवलेली नाही. त्यामुळे सदर साहित्य 31/03/2016 पूर्वी प्राप्त झाल्याची सत्यता पडताळता आली नाही.

3) सदर ई-लर्निंग साहित्य वाटप केलेल्या शाळांची निवड कोणी व कशाच्या आधारे केली. त्याची कागदपत्रे उपलब्ध झालेली नाहीत.

4) तालुका स्तरावर वाटप केलेल्या शाळांची नोंद नसल्याने जिल्हा परिषद स्तरावरून खरेदी करून पुरवठा केलेल्या शाळांना पुन्हा साहित्य दिल्याची शक्यता नाकारता येत नाही.

5) देयकासोबत शासकिय मान्यता पात्र संस्थेकडून सदर साहित्याची चाचणी केल्याचा अहवाल जोडलेला नाही. त्यामुळे उत्तम प्रतिचे साहित्य पुरवठा केल्याची सत्यता पडताळता आली नाही.

6) सदर साहित्य वापरलेल्या शाळांचा सदर ई-लर्निंग साहित्य वापर करून ते योग्य असल्याचे प्रमाणपत्र किंवा त्यांचा अहवाल प्राप्त झालेला नाही. म्हणजेच सदर योजनेचे उद्दिष्ट साध्य झाले किंवा नाही. त्याचा अहवाल प्राप्त झालेला नाही.

7) वरील साहित्याचा पुरवठा आदेश दिनांक 29/03/2016 दिलेला असतानाही साहित्य प्राप्त झाल्याची नोंद नसताना दिनांक 31/03/2016 पुरवठादाराला रक्कम अदा केलेली आहे.

### 4.49 इयत्ता 5 वी ते 7 वी च्या विदयार्थ्यांसाठी ई-लर्निंग संच खरेदीबाबत.

**पंचायत समिती पनवेल, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 24) -** पंचायत समिती, पनवेलचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षणात शिक्षण विभागाचे लेखापरिक्षण केले असता शिक्षण विभागामार्फत पंचायत समिती सेस अंतर्गत पनवेल गटातील जिल्हा परिषद शाळांतील विदयार्थ्यांसाठी ई-लर्निंग संच खरेदी करता रक्कम रुपये 10,00,000/- तरतूद करून इयत्ता 5 वी ते 7 वी विदयार्थ्यांसाठी 3 प्रमाणकान्वये रक्कम रुपये 73,21,500/- खर्च करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त कामाची नस्ती तपासली असता टिपणीवर गट विकास अधिकारी, सभापती यांच्या मान्यता स्वाक्षरी नाही.

2) ई-लर्निंग संच शाळेसाठी खरेदी करतांना त्या शाळांची मागणी पत्र लेखापरिक्षणास प्राप्त करून देण्यात आली नाही. तसेच सदर ई-लर्निंग संच चालविण्याकरीता त्या शाळेत विदयुत पुरवठा व इंटरनेट सेवा आहे काय या बाबतचे दाखले मुख्याध्यापकामार्फत घेतले नाहीत.

3) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 94 नुसार खरेदी केलेल्या वस्तुच्या नोंदीसाठा नोंद नमुना 33 मध्ये घेणे आवश्यक आहे. तथापि पंचायत समितीने खरेदी केलेले ई-लर्निंग संच नग 105 साठा नोंदवहीत नमुद नाहीत.

4) उपयुक्त ई-लर्निंग संच पुरवठा करण्यापुर्वीच पुरवठा धारकास देयकांचे प्रदान दिनांक 24/07/2015 रोजी करण्यात आले आहे. उदा. जिल्हा परिषद शाळा, मोरबेला सदरचा संच दिनांक 30/07/2015 ला पोच झाला असून जिल्हा परिषद शाळा वाकडी व पडघे यांना दिनांक 23/07/2015 ला ई-लर्निंग संच पोच झाले आहे.

5) उपरोक्त कामाचे देयके तपासली असता प्रमाणक क्रमांकानुसार इयत्ता 7 वी साठी साहित्य पुरवठा झालेला दिसून येतो.

16, दिनांक 24/07/2015 - 35 संच इयत्ता 7 वी

17, दिनांक 24/07/2015 - 35 संच इयत्ता 7 वी

18, दिनांक 24/07/2015 - 35 संच इयत्ता 7 वी

म्हणजे इयत्ता 5 वी व 6 वी चे ई-लर्निंग व त्या सोबतचे साहित्य प्राप्त झाले नसल्याचे दिसून येते.

6) उपरोक्त ई-लर्निंग संच खरेदी करतांना भाग पाडून खरेदी प्रक्रिया करण्यांत आली आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/1089/प्र.क्र. 854/33, दिनांक 08/02/1990 नुसार एकाच कामाचे दोन भाग पाडता येत नाही. तथापि, पंचायत समिती ई-लर्निंग संच 105 इयत्ता 5 वी ते 7 वी विदयार्थ्यांसाठी खरेदी करतांना भाग पाडून खरेदी करण्यात आली आहे. हे नियम बाहय ठरते.

7) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 चे नियम 87 नुसार खरेदी केलेल्या साहित्याची गुणवत्ता व दर्जा योग्य असल्याबाबत शासकीय किंवा शासनमान्य विभागात साहित्याची चाचणी अहवाल प्राप्त करुन घेणे आवश्यक आहेत. तथापि खरेदी केलेल्या ई-लर्निंग संचाची वापरण्यास योग्य असल्याबाबतचे चाचणी अहवाल लेखापरिक्षणात प्राप्त झाले नाहीत.

8) उपरोक्त साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश हे लेखा विभागामार्फत देण्यात आले असून पंचायत समितीचे शिक्षण विभागात आवक / जावक नोंदवही असता लेखा विभागामार्फत पुरवठा आदेश देण्याचे प्रयोजन काय? सदरचे पुरवठा आदेश शिक्षण विभागामार्फत का देण्यात आले नाही, याबाबतचा खुलासा होणे आवश्यक आहे.

9) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 151 नुसार खरेदीस प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि ई-लर्निंग संच खरेदी करतांना प्रशासकीय मान्यता आदेश पत्र लेखापरिक्षकास प्राप्त करुन देण्यांत आले नाही.

10) उपरोक्त ई-लर्निंग संच जिल्हा परिषद शाळांना प्राप्त झाल्याबाबतचे शाळांच्या दिनांकीत पोच लेखापरिक्षणात प्राप्त झाल्या नाहीत.

11) उपयोगिता दाखले लेखापरिक्षणात प्राप्त झाले नाही.

**4.50 इयत्ता 1 ली ते 4 थी च्या विदयार्थ्यांसाठी ई-लर्निंग संच खरेदी बाबत.**

**पंचायत समिती पनवेल, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 28) -** पंचायत समिती, पनवेलचे सन 2015-2016 या वित्तीय वर्षाचे (लेखापरिक्षणात) शिक्षण विभागाचे लेखापरिक्षण केले असता शिक्षण विभागामार्फत पंचायत समिती सेस अंतर्गत पनवेल गटातील जिल्हा परिषद शाळांकरिता इयत्ता 1 ली ते 7 वी च्या विदयार्थ्यांसाठी ई-लर्निंग संच खरेदी रूपये 10,00,000/- ची तरतूद करुन इयत्ता 1 ली ते 4 थी च्या विदयार्थ्यांसाठी प्रमाणक क्रमांक 15, दिनांक 24/07/2015 अन्वये रक्कम रुपये 24,32,500/- खर्च करण्यात आली आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 94 नुसार खरेदी केलेल्या ई-लर्निंग सेट खरेदीची नोंद साठा नोंदवही नंबर 33 मध्ये घेवून विनियोग दाखविण्यात आला नाही.

2) पंचायत समितीस प्राप्त झालेल्या ई-लर्निंग संचाचे प्रमाणित डिलीव्हरी चलन लेखापरिक्षणास उपलब्ध करुन दिले नाही. त्यामुळे सदरचे संच समितीस केव्हा प्राप्त झाले याची लेखापरिक्षणात तपासणी करता आली नाही.

3) उपरोक्त ई-लर्निंग संच खरेदी करताना भाग पाडून खरेदी प्रक्रिया करण्यांत आली आहे. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए/1089/प्र.क्र.854/33, दिनांक 08/02/1990 नुसार एकाच कामाचे दोन भाग पाडता येत नाही. तथापि पंचायत समितीने इयत्ता 1 ली ते 4 थी च्या विदयार्थ्यांसाठी ई-लर्निंग संच खरेदी करतांना 4 भाग पाडून खरेदी करण्यात आले आहेत.

4) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 चे नियम 87 नुसार खरेदी केलेल्या साहित्याची गुणवत्ता व दर्जा योग्य असल्याबाबत शासकीय किंवा शासनमान्य प्रयोगशाळेत तपासण्या करुन त्यांचे चाचणी अहवाल घेणे आवश्यक असतांना असे चाचणी अहवाल लेखापरिक्षणांत उपलब्ध करुन देण्यात आले नाही.

5) उपरोक्त साहित्य खरेदीचे पुरवठा आदेश हे लेखा विभागामार्फत देण्यात आले आहेत. पंचायत समितीमध्ये शिक्षण विभागात आवक / जावक नोंदवही स्वतंत्र असतांना लेखा विभागाकडून पुरवठा आदेश निर्गमित करण्याचे प्रयोजन काय? शिक्षण विभागातुन पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आले नाही, याबाबत खुलासा करावा.

6) उपरोक्त कामाची खरेदी नस्ती तपासली असता टिप्पणीवर सहाय्यक गटविकास अधिकारी / गटविकास अधिकारी / शिक्षण आधिकारी यांच्या मंजूरीची स्वाक्षरी नाही.

7) उपरोक्त खरेदीसाठीचे प्रशासकीय मान्यता आदेश नस्ती सोबत जोडली नाही.

### 4.51 सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजना अनुदानाबाबत.

**पंचायत समिती सुधागड-पाली, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** पंचायत समिती, सुधागड-पाली अंतर्गत असलेल्या शाळांपैकी काही निवडक शाळांची उपलब्ध लेखे तपासले असता वरील योजनेच्या प्राप्त व वाटप अनुदानात आढळून आलेल्या त्रुटींबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती शाळांना प्राप्त अनुदानापैकी तपासणी वित्तीय वर्षा अखेर 6 शाळांकडे अनुदान अखर्चीत / शिल्लक असल्याचे दिसुन येते. सदर अनुदान अखर्चित का राहिले व ते वेळीच परत का केले नाही. याबाबत खुलासा करावा व अशा खालील शाळांचे व अशा इतर शाळांचे अखर्चित अनुदना त्वरित शासनाकडे परत करणे आवश्यक आहे.

2) सदर योजनेसाठी पाठविलेले प्रस्ताव संख्या, मंजूर झालेली लाभार्थी संख्या व त्यांची नावे सर्व शाळेकडे नसल्यामुळे वाटप अनुदान हे मंजूर लाभार्थीलाच अदा केल्याची तपासणी करता आली नाही.

3) सदर योजनेतून प्राप्त अनुदान संबंधीत लाभार्थी यांचे बँक खाती जमा न करता 2 किंवा यापैकी जादा लाभार्थींचे एकाच बँक खाती नियमबाहयपणे रक्कम जमा केल्याची दिसुन येते. तसेच काही शाळांकडे लाभार्थी नावे संख्या व रक्कम मिळाल्याची पोच नाही आहे. आता सदर शाळा व इतर शाळांची तपासणी/चौकशी करुन सदर बाबत खुलासासह पूर्तता अनुपालन दाखवावी.

4) सदर योजनेतून प्राप्त अनुदान हे लाभार्थी यांच्या बँक खाती रक्कम जमा करणे आवश्यक असताना 7 शाळांनी ते रोखीने अदा केल्या आहेत.

### 4.52 शालेय पोषण आहारापासून विदयार्थी वंचित ठेवलेल्याबाबत.

**पंचायत समिती माणगांव, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 2) -** पंचायत समिती माणगांव अंतर्गत शालेय पोषण आहार योजने संबंधीचे अभिलेख्यांची पडताळणी केली असता वित्तीय वर्ष सन 2015-2016 मध्ये 3 माध्यमिक शाळांमध्ये काही कालावधीकरीता शालेय पोषण आहार योजनेचा लाभ दिला नसल्याचे दिसून येते. शासनाने सक्तीची केलेली शालेय पोषण आहार योजनेचा लाभ उपरोक्त माध्यमिक शाळांनी न देण्याबाबत खुलासा करावा.

### 4.53 जिल्हा परिषद शाळांमधील मुख्याध्यापकांनी स्वत: नावे रकमा आहरित केल्याबाबत.

**पंचायत समिती तळा, जिल्हा रायगड, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** पडताळणी केलेल्या शाळांची संख्या 15 व अंतर्भुत रक्कम रूपये 8,96,628/- याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, तळा सन 2015-16 मध्ये शिक्षण विभागातंर्गत जिल्हा परिषद शाळा व खाजगी मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांमधील शालेय पोषण आहार संबंधीचे अभिलेखे (रोखवही / बँक विवरणपत्रे) यांची पडताळणी केली असता शालेय पोषण आहारासंबंधी इंधन खर्च व मानधनाच्या जमा रक्कमा सर्व संबंधीतांना मुंबई वित्तीय नियम 1959 मधील प्राधिकारानुसार रक्कम रुपये 500/- वरील रक्कम धनादेशाने अदा करणे आवश्यक

असताना जिल्हा परिषद शाळा / माध्यमिक विद्‌यालये यांनी सदच्या रक्कमा स्वत: (Self) काढल्याचे दिसून येते. याबाबत शिक्षण विभागातील गटशिक्षणाधिकारी / अधिक्षक / विस्तार अधिकारी / केंद्र प्रमुख यांनी शाळा भेटी दरम्यान सदर प्रदानाबाबतची अनियमितता लक्षात घेता उचित कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

तसेच शालेय पोषण आहारासंबंधीचे साठा नोंदवहया व इतर सर्वच नोंदवहया व त्यातील नोंदी अपूर्ण असल्याचे दिसून आले. याबाबत पंचायत समिती स्थरावरुन योजनेचे सनियंत्रण व्यवस्थितपणे केल्याचे दिसून येत नाही.

शाळांमधील मुख्याध्यापकांनी पोषण आहार मानधनाच्या रक्कमा स्वत:च्या नांवे काढण्याबाबत खुलासा करुन सदर रक्कमा लाभ धारकांस पंचायत समिती कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानुसार अदा केल्याची खात्री पटवावी.

**4.54 शिक्षण विभागाकडील चुकीच्या एकस्तर वेतन निश्चितीमुळे झालेल्या अतिप्रदानाबाबत.**

**पंचायत समिती कळवण, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती कळवण सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात उदाहरणादाखल नमूद शिक्षकांना चुकीचा एकस्तर लाभ लागू केल्याने जादा प्रदान करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचे परिपत्रक क्रमांक-जिपना/अर्थ/आस्था /147/2011 दिनांक 07/03/2011 नुसार 6 व्या वेतन आयोगामध्ये एकस्तर वेतनश्रेणी लागू करण्याबाबत सूचित केल्यामुळे एकस्तर वेतनश्रेणीनुसार सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चितीमुळे वेतन व भत्ते प्रदान करण्यात आलेले आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक 06/08/2002 मधील परिच्छेद क्रमांक 7 नुसार आदिवासी व नक्षलग्रस्त भागात काम करण्यासाठी प्रोत्साहन म्हणून गट अ ते गट ड मधील सर्व पदधारकांना संबंधित कर्मचारी /अधिकारी त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंतच्या काळात त्यांनी धारण केलेल्या मूळ पदाच्या नजीकची वरिष्ठ वेतनश्रेणी / पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी व त्या अनुषंगाने वेतन निश्चितीचा लाभ देण्यात यावा, मात्र ज्या कर्मचारी / अधिका-यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे, त्यांना आणखी वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय नसेल असे नमूद आहे.

अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, नंदूरबार यांना पत्र क्रमांक एस आर व्ही -12/412/2009, दिनांक 04/05/2010 अन्वये असे कळविले आहे की, सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्य शासकिय कर्मचा-यांना दिनांक 01/01/2006 पासून सुधारीत वेतन बँड व ग्रेड पे लागू करण्यात आला असल्याने एकस्तर पदोन्नती योजने अंतर्गत सुधारीत वेतन बँड व ग्रेड पे कशाप्रकारे अनुज्ञेय करावा याबाबत अंतिम निर्णय अद्‌याप झालेला नाही. सदर निर्णय होताच तो सर्व संबंधितांना कळविण्यात येईल.

उपसचिव ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई यांनी सर्व विभागीय आयुक्त व सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी (महाराष्ट्र राज्य) यांना लिहीलेले पत्र क्रमांक- वेतन/प्रा.क्र./116-आस्था 10, दिनांक 17/04/2013 कळविले आहे की, दिनांक 06/08/2002 च्या शासन आदेशानुसार आदिवासी/नक्षलग्रस्त भागात कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांना त्या क्षेत्रात कार्यरत असेपर्यंत लागू करण्यात आलेली एकस्तर पदोन्नती व अन्य सवलतींचा लाभ सहाव्या वेतन आयोगानुसार लागू केलेला सुधारीत वेतन बँड, ग्रेड पे कशाप्रकारे द्‌यावा, याबाबतचा प्रस्ताव विचाराधीन आहे, त्यावर निर्णय होताच आवश्यक आदेश निर्गमित करण्यात येतील. त्यामुळे जोपर्यंत विषयांकित प्रकरणी शासन आदेशाद्‌वारे अंतिम निर्णय होत नाही, तोपावेतो नाशिक जिल्हा परिषदेने प्रदान केलेला लाभ हा नियमबाहय आहे व चाचणी लेखापरिक्षणामध्ये 9 कर्मचाऱ्यांची वेतन पडताळणी केली असता एकूण रक्कम रुपये 13,72,259/- वसुलपात्र आहे. ती वसुल करणेत यावी.

**4.55 गणवेश अनुदान वाटपाबाबत.**

**पंचायत समिती बागलाण, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 12) -** पंचायत समिती बागलाणने सन 2015-2016 या वित्तीय वर्षात जिल्हा परिषद यांचेकडील प्राथमिक शाळेतील मुला / मुलींना गणवेश वाटपासाठी खालील प्रमाणे रक्कम रुपये 7,33,743/- इतका खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक गणवे/2001/प्र.क्र.19/25, दिनांक 22/02/2003 मधील उपपरिच्छेद 20 नुसार तसेच पी.आर.ई/03/17/03 प्रशि-4, दिनांक 20/05/2004 अन्वये प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना शाळा सुरु होणेपुर्वी (माहे जुन मध्ये गणवेश पुरविणेबाबत) स्पष्ट आदेश असतांना सन 2015-2016 मध्ये लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश वाटपाचे देयके माहे मार्च 2016 अखेर लेखा विभागातुन पारित करण्यात आलेले आहे.

2) सदर अनुदान हे सन 2015-2016 करीता गणवेश वाटपा करीता मंजुर असतांना दिनांक 31/03/2016 रोजी सदरचे देयकांनुसार प्रदान करण्यात आल्याचे दिसुन येते. उपरोक्त शासन निर्णयानुसार शाळा सुरु होणेपुर्वी माहे जुन, 2015 मध्येच सदर विदयार्थ्यांना गणवेशाचे वाटप होणे गरजेचे असतांना त्यांना शालेय वर्ष संपल्यानंतर गणवेशाचे वाटप झाल्याचे दिसुन येते. सदर बाब ही शासन निर्णयाच्या विरुध्द असुन त्याचा साधार खुलासा करावा.

3) सन 2015-2016 या कालावधीत विहित वेळेत वाटप न केल्याने लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मुदतीत न दिल्यामुळे लाभार्थ्यास लाभापासुन वंचित राहवे लागले आहे. याबाबत संबधितांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

4) सदर गणवेश वाटपाबाबतची नस्ती व अनुषंगिक कागदपत्रे, उपयोगिता प्रमाणपत्रे लेखापरीक्षणास प्राप्त न झाल्याने विदयार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले किंवा कसे याची पडताळणी करता आली नाही.

5) सन 2015-2016 अखेर 1,453/- इतकी गणवेश वाटपाबाबतची रक्कम अखर्चित असल्याचे दिसुन आले. तरी शिल्लक अखिर्चित अनुदान शासनास परत करुन अनुपालन दर्शवावे.

**4.56 संगणक अर्हताकारी (एमएससीआयटी) परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचा-यांना नियमबाहय वेतनवाढी प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती मालेगाव, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 33) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 अन्वये शासकीय गट-अ,ब व क संवर्गातील कर्मचा-यांना संगणक परीक्षा एमएससीआयटी ही विहित मुदतीत उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्तीर-04/224/39, दिनांक 26/05/2004 नुसार वयाच्या 50 वर्षापेक्षा जास्त वयातील कर्मचा-यांना सदर परीक्षेपासून सुट देण्यात आलेली आहे. सदरची संगणक परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास त्यांच्या पुढील वेतनवाढी रोखणेबाबत स्पष्ट आदेश निर्गमित केलेले आहेत. सदरची संगणक परीक्षा ही शासन निर्णय क्रमांक मातंसे/नस्ती -4/224/39, दिनांक 05/05/2007 अन्वये दिनांक 01/01/2007 ते दिनांक 31/12/2007 अखेर पास होणेबाबत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. परंतु उपरोक्त् नमूद कर्मचा-यांनी सदरची परीक्षा पास केलेली नाही. त्यामुळे त्यांच्या दिनांक 01/07/2008 पासुन पुढील नियमित वेतनवाढी रोखणे आवश्यक असतांना नियमित वेतनवाढी प्रदान केलेमुळे वेतन व भत्ते यांचे अतिप्रदान झालेले आहे.

सदर 50 प्राथमिक शिक्षकांना डिसेंबर, 2007 नंतर त्यांना मंजूर केलेल्या वेतनवाढीची व भत्त्याची रक्कम रुपये 1,43,38,829/- संबंधिताकडून वसुल करण्यात यावी. अतिप्रदानाची रक्कम शासन सदरी भरणा केले बाबत चलनाची प्रत लेखापरीक्षणास सादर करावी.

तसेच इतर प्राथिमिक शिक्षकांच्या सेवापुस्तकात संगणक परीक्षा उत्तीर्ण केलेबाबत नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. अशा शिक्षकांची उपरोक्त नियमानुसार अतिप्रदान वेतन व भत्यांची रक्कम वसुल करावी. तशा नोंदी सेवा पुस्तकात घेण्यात येवून अनुपालन दर्शवावे.

**4.57 प्राथमिक शाळेतील मुलींचे उपस्थिती भत्त्याबाबत.**

**पंचायत समिती मालेगाव, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 53) -** पंचायत समिती ने सन 2015-2016 या वित्तीय वर्षात उपस्थिती भत्ता वाटपासाठी रक्कम रुपये 4,26,090/- इतका खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई-1091/(9614)/प्राशि.1, दिनांक 18/02/1993 अन्वये जोडपत्र अ परिच्छेद क्रमांक 5 व 6 प्रमाणे विस्तार अधिकारी शिक्षण/पर्यवेक्षक लाभ अनुज्ञेयतेची तपासणी करतील व लाभार्थींच्या पालकांना ती रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा अहवाल गटशिक्षण अधिकारी यांना सादर करण्याबाबत वारंवार मागणी करुनही अहवाल लेखापरीक्षणाला प्राप्त झाले नाही. त्याकारणाने उपस्थिती भत्ता संबंधीत मुलींना नियमानुसार वाटप झाल्याची पडताळणी करता आली नाही.

2) शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई-1091/(9614)/प्राशि.1, दिनांक 18/02/1993 च्या जोडपत्र अ परिच्छेद 8 प्रमाणे शिक्षण विस्तार अधिकारी एकूण लाभार्थींच्या 10 टक्के आणि गटशिक्षणाधिकारी यांनी 25 टक्के पालकांच्या भेटी घेऊन योजनेच्या अंमलबजावणीची खात्री करतील. नियमाप्रमाणे केलेल्या कार्यवाही बाबतच्या अभिलेख्यांची वारंवार मागणी करुन तसे अहवाल प्राप्त न झालेने उक्त शासन परिपत्रकांप्रमाणे भेटी घेवून अहवालाद्वारे योजना प्रभावीपणे राबविली गेल्याची खात्री करता आली नाही.

3) उपस्थिती भत्ता मुलींना त्यांचे बँक खाते खोलुन त्यांना वाटप केल्याबाबत व त्यांना प्राप्त झाल्याबाबतच्या पोहोच लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाही.

4) सन 2015-2016 अखेर दारिद्र रेषेखालील विद्यार्थीसाठी रूपये 23,674/- इतकी उपस्थिती भत्याची रक्कम अखर्चित असल्याचे दिसुन आले. तरी शिल्लक अखिर्चित अनुदान शासनास परत करुन अनुपालन दर्शवावे.

**4.58 एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी मंजूर केल्याने झालेल्या जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती त्र्यंबकेश्वरच्या सन 2015-2016 च्या लेखापरीक्षणात, निवडक महिन्यातील फेब्रुवारी, 2016 देय मार्च, 2016 शिक्षण विभागाकडील प्राथमिक शिक्षकांचे वेतन देयक व सेवापुस्तक तपासतांना उदाहरणादाखल एकूण 15 कर्मचाऱ्यांना शासन धोरणाप्रमाणे संगणक हाताळणी व वापराबाबतचे ज्ञान आवश्यक असणेबाबत एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण नसतांना किंवा त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नसतांना त्यांना दिनांक 01/07/2008 ते 01/07/2016 पर्यंतच्या वेतनवाढी मंजूर करुन अतिप्रदान केल्याचे निदर्शनास आले. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक मागासे/नस्ती-4/224/39, दिनांक 05/07/2007 अन्वये सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिनांक 31/12/2007 ही शेवटची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे दिनांक 01/01/2008 पासुन पुढे व वय वर्षे 50 पूर्ण होण्याच्या आत जिल्हा परिषद कर्मचा-यांनी एमएससीआयटी- संगणक परीक्षा तात्काळ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा 01/01/2008 नंतर दिनांक 01/07/2008 व त्यापुढील दरवर्षीच्या नियत वेतनवाढी रोखणे आवश्यक आहे. दिनांक 01/07/2008 ते दिनांक 01/07/2016 पर्यंतच्या वेतनवाढी देय नसतांना त्यांना सदर वेतनवाढी मंजूर करुन वेतन - भत्ते प्रदान केल्याने अतिप्रदान झाले असून दिनांक 01/07/2008 ते दिनांक 31/07/2016 या कालावधीत दरमहा झालेल्या अतिप्रदानाची एकूण रक्कम रुपये 33,52,683/- संबंधीतांकडून वसुल करुन योग्य त्याशासन लेखाशिर्षामध्ये भरणा करुन चलनाच्या प्रतीसह अनुपालन सादर करावे. सदर आक्षेपातील नमुद नावे केवळ उदाहरणादाखल असून गटविकास अधिकारी यांनी याबाबत

संबंधितांना सुचना देवून वरीलप्रमाणे असणाऱ्या इतर सर्व समान प्रकरणांचा शोध घेऊन त्यांचेकडून अतिप्रदानाची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे. याबाबत असेही अभिप्राय देण्यात येत आहेत की, संबंधित विभागाचे प्रमुख म्हणून संबंधित गटशिक्षण अधिकारी व कार्यालय प्रमुख म्हणून गट विकास अधिकारी या दोन्ही अधिकाऱ्यांनी शासनाच्या वतीने कामकाज करतांना शासन निर्णयांचे/शासनाच्या ध्येय धोरणाचे पालन होईल याबाबत आवश्यक ती दक्षता घेतलेली दिसून येत नाही.

त्याच प्रमाणे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, 1968 चे नियम 3 चे परिशिष्ट एक मधील नियम क्रमांक 1(1) चा (क) तसेच परिशिष्ट चार मधील भाग-ब, उपविभाग (1) मधील नियम क्रमांक 18 आणि 19 (3) नुसार, जिल्हा परिषदेचे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या विविध विभागांचे/कार्यालयांचे अंतर्गत लेखापरीक्षण दरवर्षी करुन लेखापरीक्षण अहवाल निर्गमित करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे अंतर्गत लेखापरीक्षणा अभावी प्रभावी वित्तीय नियंत्रण राहू शकत नाही. तसेच नियमितपणे अशी पडताळणी होत नसल्याने, वरीलप्रमाणे आवश्यक ती परीक्षा उत्तीर्ण नसतांनाही दिलेल्या वेतनवाढीमुळे झालेली अतिप्रदानाची प्रकरणे वेळीच उघडकीस येत नाहीत व शासनाचे आर्थिक नुकसान होत असते.

**4.59 शिक्षण विभागातील संगणक अर्हता विहीत मुदतीत पास नसतांना वेतनवाढ दिल्याबाबत**

**पंचायत समिती नंदुरबार, जिल्हा नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,17,81,217/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती, नंदुरबार सन 2015-2016 लेखापरीक्षण कालावधीत शिक्षण विभागातील कर्मचारी यांनी विहीत मुदतीत संगणक अर्हता विहीत मुदतीत उत्तीर्ण झालेले नाही. शासन निर्णय क्र. मातसे/नस्ती 04/224/39 दिनांक 5/5/2007 अन्वये दिनांक 31/12/2007 अखेर पास होणे बाबत मुदत वाढ देण्यात आली आहे. सदरची संगणक परीक्षा विहीत मुदतीत उत्तीर्ण न झाल्यास वेतनवाढ रोखणेबाबत स्पष्ट आदेश असतांना खालील कर्मचारी यांना वेतनवाढ देण्यात आली आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) श्री. वाय. एन. बहिरम प्रा. शिक्षक | - | रक्कम रुपये | -- | 2,78,758/- |
| 2) श्री. व्ही. पी. सोनवणे, प्रा. शिक्षक | - | रक्कम रुपये | -- | 4,56,112/- |
| 3) श्री. एस. एस. गांगुर्डे, प्रा. शिक्षक | - | रक्कम रुपये | -- | 88,326/- |
| 4) श्री. एस. एम. सोनवणे, प्रा.शिक्षक | - | रक्कम रुपये | -- | 4,36,490/- |
| 5) श्री. बी.डी. पिंजारी, प्रा. शिक्षक | - | रक्कम रुपये | -- | 1,65,650/- |

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे रक्कम रुपये 14,25,336/- संबंधितांकडुन वसुल करुन अनुपालन लेखापरीक्षणास दर्शवावे.

**4.60 केंद्र प्रमुखांना दरमहा रुपये 1,650/- नियमबाहय प्रवासभत्ता प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती नंदुरबार, जिल्हा नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 48) -** सदरबाबत रक्कम रुपये 11,97,700/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक- पीआरई 2012/प्र.क्र.77/प्राशि-1, दिनांक 22/03/2013 अन्वये केंद्र प्रमुखांना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक 14/11/1994 च्या शासन निर्णयानुसार वेतन उद्दिष्टांमधुन रुपये 200/- एवढा कायम प्रवासभत्ता अनुज्ञेय करण्यात आला आहे. सदर कायम प्रवासभत्ता वित्त विभागाच्या मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 383 अन्वये लागू करण्यात आलेला नाही. यास्तव, वित्त विभागाच्या दिनांक 03/03/2010 च्या शासन निर्णयान्वये कायम प्रवासभत्याच्या दरात सुधारणा करण्यात आली असली, तरी सदर दर ( रुपये 1,650/-) हे केंद्र प्रमुखांना लागू होत नाहीत. असे असताना एकूण केंद्र प्रमुखांना कायम प्रवासभत्याचे नियमबाहय रक्कम रुपये 11,97,700/-चे प्रदान केलेले आहे.

**4.61 आदिवासी प्रोत्साहन भत्ता नियमबाहय प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती तळोदा, जिल्हा नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** सदरबाबत रक्कम रुपये 7,60,055/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक आस्था-1097/प्र.क्र.18/का-15, दिनांक 15/11/1997 स्पष्टीकरण 2 अन्वये, शिक्षकांना उन्हाळी सुट्टी सलग 30 दिवसापेक्षा जास्त असल्याने प्रोत्साहन भत्ता देय होत नाही. पंचायत समितीने अनुक्रमे प्रमाणक क्रमांक 18 व 19, दिनांक 09/07/2015 रक्कम रुपये 1,12,03,246/- व 74,69,663/- एकूण 1,86,72,909/- माहे मे, 2015 चे वेतन देयकातुन रक्कम रुपये 4,85,263/- व 2,74,792/- एकूण 7,60,055/- आदिवासी प्रोत्साहन भत्ता नियमबाहय प्रदान केलेला आहे. सदर रक्कम संबधितांकडून वसुल करणे आवश्यक आहे.

**4.62 केंद्र प्रमुखांना दरमहा रुपये 1650 नियमबाहय प्रवास भत्ता प्रदानाबाबतची अनियमितता.**

**पंचायत समिती धडगांव अक्राणी, जिल्हा नंदुरबार, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4)** - सदरबाबत रक्कम रुपये 17,78,700/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

पंचायत समिती धडगांव अक्राणी यांचे सन 2015-16 चे निवडक महिन्याचे लेखापरिक्षण करतांना शिक्षण विभागाकडील शाळा केंद्रप्रमुखांची प्रवास भत्ता देयके तपासली असता संबंधीत शाळा केंद्रप्रमुखाना त्यांच्या दरमहाच्या वेतन देयकामध्ये कायम प्रवास भत्ता रुपये 1,650/- आणी रुपये 800/- वाहन भत्ता अशी एकूण रक्कम रुपये 2,250/- अदा करण्यांत आलेली आहेत. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई 2012/प्र.क्र.77/प्राशि-1, दिनांक 22/03/2013 अन्वये शाळा केंद्रं प्रमुखांना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक 14/11/1994 च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार वेतन उददीष्टांमधुन रुपये 200/- एवढा कायम प्रवास भत्ता अनुज्ञेय करण्यांत आलेला आहे. सदर कायम प्रवास भत्ता वित्त विभागाच्या मुंबई नागरी सेवा नियम 1959 मधील नियम 383 अन्वये मात्र लागू करण्यांत आलेला नाही. यास्तव महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 03/03/2010 च्या शासन निर्णयामध्ये कायम प्रवास भत्यांच्या दरात सुधारणा करण्यांत आली असली, तरी सदर दर रक्कम रुपये 1,650/- हा शाळा केंद्रप्रमुखांना लागू होत नाही. असे असतांना देखील पंचायत समिती धडगांव यांनी संबंधित शाळा केंद्रं प्रमुखांना रुपये 200/- ऐवजी रुपये 1,650/- कायम प्रवास भत्ता वेतनांत आदा केलेला आहे. तरी जादा आदा केलेली कायम प्रवास भत्याची रक्कम रुपये 15,63,100/- संबंधीतांकडून त्वरीत वसूल करुन योग्य त्या लेखाशिर्षाखाली चलनाव्दारे शासन सदरी जमा करावी.

**4.63 शालेय पोषण आहार योजनेबाबत. (केंद्र व राज्य)**

**पंचायत समिती यावल, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 65) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,89,85,138/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शालेय पोषण आहार योजनेतुन पंचायत समिती यावल सोबत जोडलेल्या परिशिष्ट .. नुसार अंतर्गत केंद्र व राज्य यांचे हिश्श्याचे मंजूर अनुदान रुपये 1,81,85,618/- मधुन रक्कम रुपये 1,71,40,336/- खर्च करुन रक्कम रुपये 10,45,282/- अखर्चित आहेत. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय देणेत येत आहेत.

1) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.136 प्रशि-4, दिनांक 18/06/2009 सदर योजनेअंतर्गत इयत्ता 1 ते 5 वी विद्यार्थ्यांना 450 उष्मांक व 20 ग्राम प्रथिनेयुक्त दुपारचे भोजन घ्यावयाचे आहे. देण्यात येणाऱ्या आहारात उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे घटक आहेत. याची खात्री करणेसाठी प्रयोगशाळेकडून तपासणी अहवाल प्राप्त करावयाच आहे. तथापि, चाचणी अहवाल घेतलेला नाही.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक- मआक-10099/प्रक्र.36/99विनयम, दिनांक 28/10/2004 अन्वये दुबार देयके प्रतिबंधक नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबार प्रदानाची खात्री करता आली नाही.

3) गटाने वित्तीय वर्षात उचलेल्या तांदुळ हिशोबाची गटस्तरावर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, शासन पुरकपत्र क्रमांक शापोअ- 2006/8201/06 प्रशि-4, दिनांक 11/09/2006 नुसार प्रतिदिन विद्यार्थ्यांना उपस्थित असल्यांची संख्यानुसार विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे वाटप केल्याबाबत संबंधीत मुख्यध्यापकांचा अहवाल प्राप्त केला नाही

5) दर दिवशी प्रती विदयार्थी अन्नासाठी उपयोगात आलेल्या धान्यनुसार पोषण आहाराची मागणी करुन त्यानुसार पंचायत समितीने अनुदानाची रक्कम प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही.

6) पंचायत समितीकडून शाळा स्तरावर वेळोवेळी भेटी देवून शासन निर्णय क्रमांक शापोआ-2009/प्र.क्र.136 प्रशि-4, दिनांक 18/06/2009 मधील खर्चानुसार दिला, जमा असलेल्या पोषण आहाराची पहाणी अहवाल नस्ती आढळली नाही.

7) प्राथमिक शाळेवर खिचडीसाठी लागणाऱ्या साहित्याची प्रत्येक महिन्यात गोषवारा काढलेली शिल्लक साहित्य दशविले जात नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद, पंचायत समित्या लेखा संहिता 1968 मधील नियम 29(4) नुसार रुपये 500/- वरील रक्कम प्रदान धनादेशाव्दारे करणे आवश्यक असतांना रोखीने दिली जाते.

9) ग्राम समिती अध्यक्षाची रोखपुस्तकात स्वाक्षरी घेतलेली जात नाही.

10) महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोअ 2004/155/04, दिनांक 31/03/2005 अन्वये फरक पदार्थ इंधन मजुरी व्यतिरिकत आठवडयातून किमान एक वेळा अंडी बिस्कीटे त्याचप्रमाणे कॅल्शियम ऑयर्न गोळया देण्याचा निर्देश आल्याचे कोणत्याच शाळेने नियमाचे पालन केलेले नाही.

11) अखर्चित रक्कम रुपये 39,72,499/- शासन खाती जमा करणे आवश्यक आहे.

**4.64 पंचायत समिती सेस मधुन प्राथमिक शाळांना संगणक पुरविण्याबाबत.**

**पंचायत समिती भुसावळ, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,82,400/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र जिल्हा परिषद लेखा संहिता नियम 1968 चे नियम 83(3) नुसार प्राप्त साहित्य स्पेसिफिकेशन प्रमाणे असल्याची खात्री करुन गट विकास अधिकारी यांनी देयकावर प्रमाणित न करताच साहित्याचे प्रदान करण्यात आले. त्यामुळे साहित्याची गुणवत्ता व दर्जा योग्य होता यांची खात्री करता आली नाही .

2) उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2014/प्र.क्र.82/भाग3/उद्योग4 विभाग, दिनांक 30/10/2015 अन्वये प्राप्त साहित्याची सक्षम प्राधिकरणाकडुन तपासणी करुन चाचणी करुन घेण्यात आली नाही. त्यामुळे साहित्याची गुणवत्ता व दर्जा योग्य होता यांची खात्री करता आली नाही.

3) उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2014/प्र.क्र.82/भाग3/उद्योग 4 विभाग, दिनांक 30/10/2015 अन्वये नियम क्रमांक 3.2.3 अन्वये डी.जी.एस.अँड डीयांचे दरकरारा प्रमाणे खरेदी करणे आवश्यक असतांना त्या दरकरारा प्रमाणे खरेदी न करता दरपत्रके मागवुन खरेदी केली. झालेल्या अनियमिततेबाबत संयुक्तीक खुलासा व्हावा.

4) पुरवठा आदेशात साहित्याचा पुरवठा 7 दिवसाचे आत करण्याबाबत आदेश असतांना प्रत्यक्षात साहित्याचा पुरवठा डिलेवरी चलन वरुन दिनांक 24/05/2016 रोजी झाल्याचे दिसुन येते यावरुन साहित्याचा पुरवठा न होताच प्रदान केल्याचे दिसुन येते.

5) आयकर अधिनियम कलम 194 जे अन्वये 10 टक्के आयकराची वसुली करण्यात आली नाही. रुपये 18,240/- वसुल करुन शासन खाती भरणा करावा.

6) मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 अन्वये रुपये 100/- चे मुद्रांक पेपरवर करारनामा करणे आवश्यक असतानां त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली नाही, त्यामुळे मुद्रांकाची रक्कम रुपये 100/- वसुल करुन शासन खाती जमा करावी.

7) उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2014/प्र.क्र.82/भाग3/उद्योग 4 विभाग, दिनांक 30/10/2015 अन्वये नियम क्रमांक 2.9.2 अन्वये स्तरावर खरेदी समितीची स्थापना न करताच खरेदी करण्यात आली.

**4.65 शालेय पोषण आहार खर्चाबाबत.**

**पंचायत समिती भडगांव, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 57)** - सदरबाबत रक्कम रुपये 2,30,25,498/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षण विभागाकडील, शालेय पोषण आहार योजने अंतर्गत रुपये 37,46,569/- अनुदान प्राप्त झालेले असून योजनेवर रुपये 79,98,382/- खर्च झालेला आहे व रक्कम रुपये निरंक/- अखर्चित आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2015/प्र.क्र.177/एसडी-3, दिनांक 12/10/2015 नुसार दुपारचे जेवण योजनेंतर्गत इयत्ता 1 ते 5 वीच्या विद्यार्थ्यांना 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिनेयुक्त व इयत्ता 6 ते 8 वीच्या विद्यार्थ्यांना 700 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारात घटक असणे आवश्यक आहे. तथापि, आहाराची प्रयोगशाळेकडून तपासणी अहवाल घेतलेला नाही. त्यामुळे शासन निर्णयानुसार विदयार्थ्यांना त्याच प्रमाणात आहार देण्यात आल्याची अचुकता प्रमाणित करता येत नाही.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक-म.आ.क्र./0099/प्र.क्र.36/99विनियम, दिनांक 28/10/2004 अन्वये दुबार देयके प्रतिबंधक नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबार प्रदानाची खात्री करता आली नाही.

3) गटाने वित्तीय वर्षामध्ये उचलेल्या धान्यांच्या हिशोबाची गट स्तरावर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, पुरकपत्र शासन क्रमांक- शापोआ- 2006/8201/06 प्र.शि.-4, दिनांक 11/09/2006 नुसार प्रतिदिन विद्यार्थ्यांना उपस्थित असल्याची संख्येनुसार विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे वाटप केल्याबाबत संबंधीत मुख्याध्यापकांचा अहवाल प्राप्त केलेला नाही.

5) दर दिवशी प्रति विद्यार्थी अन्नासाठी उपयोगात आलेल्या धान्यानुसार पोषण आहाराची मागणी करुन त्यानुसार पंचायत समितीने अनुदानाची रक्कम प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही.

6) पंचायत समितीकडून शाळा स्तरावर वेळोवेळी भेटी देऊन शासन निर्णय क्रमांक शापोअ 2009/प्र.क्र./136 प्र.शि.-4, दिनांक 18/06/2009 मधील खर्चानुसार जमा असलेल्या पोषण आहाराचा पाहणी अहवाल नस्ती आढळून आली नाही.

7) प्राथमिक शाळेवर खिचडीसाठी लागणारी साहित्याची प्रत्येक महिन्यांत गोषवारा काढलेली शिल्लक साहित्य दर्शविले जात नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 29(4) नुसार रुपये 500/- वरील रक्कम प्रदान धनादेशाद्वारे करणे आवश्यक असतांना रोखीने दिली जाते.

9) ग्रामसमिती अध्यक्षांची रोखपुस्तकात स्वाक्षरी घेतली जात नाही.

10) शालेय शिक्षण क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- शापोअ 2004/155/04, दि.31/3/2005 अन्वये इंधन मंजूरी व्यतिरिक्त आठवडयातून किमान एक वेळा अंडी, बिस्कीटे त्याचप्रमाणे कॅल्शियम आयर्न गोळया देण्यांचा निर्देशाप्रमाणे कोणत्याच शाळेने नियमाचे पालन केलेले नाही.

11) रक्कम रुपये निरंक/- अखर्चित असल्याने सदर रक्कमांचा वर्षनिहाय गोषवारा काढण्यात न आल्याने अखर्चित निधी कोणत्या वर्षापासुन आहे याबाबत पडताळणी करता आली नाही. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण 1002/प्र.क्र.128/आर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार शासनाने जिल्हा परिषदांना अखर्चित निधी पुढील आर्थिक वर्षाअखेर पर्यंत करण्याची अनुमती दिलेली आहे. परंतु, पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी शासनाकडे परत करणे बंधनकारक केलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- संकीर्ण 1009/प्र.क्र.66/कोषा/प्र-5, दिनांक 15/01/2010 नुसार

शासकिय पैसा शासकिय लेख्याबाहेर ठेवण्यास प्रतिबंध केलेला आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**4.66 शालेय पोषण आहार खर्चाबाबत.**

**पंचायत समिती पारोळा, जिल्हा जळगांव, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 49) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,18,53,362/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शिक्षण विभागाकडील, शालेय पोषण आहार योजने अंतर्गत रुपये 1,45,82,030/- अनुदान प्राप्त झालेले असून योजनेवर रुपये 1,18,53,362/- खर्च झालेला आहे व रक्कम रुपये 27,28,668/- अखर्चित आहे.

याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यांत येत आहेत.

1) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक-शापोआ 2015/प्र.क्र.177/एसडी-3, दिनांक 12/10/2015 नुसार दुपारचे जेवण योजनेंतर्गत इयत्ता 1 ते 5 वीच्या विद्यार्थ्यांना 450 उष्मांक व 12 ग्रॅम प्रथिनेयुक्त व इयत्ता 6 ते 8 वीच्या विद्यार्थ्यांना 700 उष्मांक व 20 ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारात घटक असणे आवश्यक आहे. तथापि, आहाराची प्रयोगशाळेकडून तपासणी अहवाल घेतलेला नाही. त्यामुळे शासन निर्णयानुसार विदयार्थ्यांना त्याच प्रमाणात आहार देण्यात आल्याची अचुकता प्रमाणित करता येत नाही.

2) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक- म.आ.क्र./0099/प्र.क्र.36/99विनियम, दिनांक 28/10/2004 अन्वये दुबार देयके प्रतिबंधक नोंदवही ठेवलेली नसल्याने दुबारा प्रदानाची खात्री करता आली नाही.

3) गटाने वित्तीय वर्षामध्ये उचलेल्या धान्यांच्या हिशोबाची गट स्तरावर नोंदवही ठेवणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

4) महाराष्ट्र शासन, पुरकपत्र क्रमांक- शापोआ 2006/8201/06 प्र.शि.-4, दिनांक 11/09/2006 नुसार प्रतिदिन विद्यार्थ्यांना उपस्थित असल्याची संख्यानुसार विद्यार्थ्यांना शासन निर्णयाप्रमाणे वाटप केल्याबाबत संबंधीत मुख्याध्यापकांचा अहवाल प्राप्त केलेला नाही.

5) दर दिवशी प्रति विद्यार्थी अन्नासाठी उपयोगात आलेल्या धान्यानुसार पोषण आहाराची मागणी करुन त्यानुसार पंचायत समितीने अनुदानाची रक्कम प्रदान केल्याची पडताळणी करता आली नाही.

6) पंचायत समितीकडून शाळास्तरावर वेळोवेळी भेटी देऊन शासन निर्णय क्रमांक-शापोअ 2009/प्र.क्र./136 प्र.शि.-4, दिनांक 18/06/2009 मधील खर्चानुसार जमा असलेल्या पोषण आहाराचा पाहणी अहवाल नस्ती आढळून आली नाही.

7) प्राथमिक शाळेवर खिचडीसाठी लागणारी साहित्याची प्रत्येक महिन्यांत गोषवारा काढलेली शिल्लक साहित्य दर्शविले जात नाही.

8) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 मधील नियम 29(4) नुसार रुपये 500/- वरील रक्कम प्रदान धनादेशाव्दारे करणे आवश्यक असतांना रोखीने दिली जाते.

9) ग्रामसमिती अध्यक्षांची रोखपुस्तकात स्वाक्षरी घेतली जात नाही.

10) शालेय शिक्षण क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक- शापोअ 2004/155/04, दिनांक 31/03/2005 अन्वये इंधन मंजुरी व्यतिरिक्त आठवडयातून किमान एक वेळा अंडी, बिस्कीटे त्याचप्रमाणे कॅल्शियम आयर्न गोळया देण्यांचा निर्देशाप्रमाणे कोणत्याच शाळेने नियमाचे पालन केलेले नाही.

11) रक्कम रुपये 27,28,668/- अखर्चित असल्याने सदर रक्कमांचा वर्ष निहाय गोषवारा काढण्यात न आल्याने अखर्चित निधी कोणत्या वर्षापासुन आहे याबाबत पडताळणी करता आली नाही. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- 1002/प्र.क्र.128/आर्थोपाय, दिनांक 06/06/2008 नुसार शासनाने जिल्हा परिषदांना अखर्चित निधी पुढील आर्थिक वर्षाअखेर पर्यंत करण्याची अनुमती दिलेली आहे. परंतु पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहिलेला निधी शासनाकडे परत करणे बंधनकारक केलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 1009/प्र.क्र.66/कोषा-प्र.5, दिनांक 15/01/2010

नुसार शासकीय पैसा शासकीय लेख्याबाहेर ठेवण्यास प्रतिबंध केलेला आहे. तथापि, याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**4.67 इयत्ता 10 वी च्या अनुसुचित जातीच्या व वि.जा.भ.ज. / विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्तीची रक्कम वाटप न करणे.**

**पंचायत समिती श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10 व 11) -** पंचायत समिती, श्रीरामपूरच्या सन 2015-2016 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणावेळी शिक्षण विभागाचे लेखापरीक्षण केले असता, 5 वी ते 10 वी मधील अनुसुचित जातीच्या व वितुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे गुणवत्ता शिष्यवृत्तीचे रक्कम रुपये 1,59,000/- व रूपये 23,000/- अनुक्रमे प्रदान करण्यात आल्याचे दिसून आले.

महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाच्या दिनांक 17/08/1995 च्या शासन निर्णयाच्या “परिशिष्ट-अ” मधील नियमावली नुसार मान्यता प्राप्त प्राथमिक/माध्यमिक शाळेतील इयत्ता 5 वी ते 10 वीच्या वर्गामध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सदर शिष्यवृत्तीची योजना लागू करण्यात आली असून, मागील वार्षिक परीक्षेत कमीत कमी 50 टक्के गुण मिळवून प्रथम व व्दितीय क्रमांकात उत्तीर्ण झालेल्या गुणवत्ताप्रधान मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीच्या योजनेचा लाभ देण्यात येतो. तसेच महाराष्ट्र शासन, समाजकल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक-इबीसी-2003/प्र.क्र.466/मावक-2, दिनांक 09/02/2007 च्या शासन निर्णयान्वये विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ केल्याने इयत्ता 5वी ते 7 वी च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना रुपये 50/- दरमहा व इयत्ता 8 वी ते 10 वीच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना रुपये 100/- दरमहा याप्रमाणे (जून ते मार्च या 10 महिन्यांसाठी) सुधारीत दराने गुणवत्ता शिष्यवृत्तीचे प्रदान करण्यात आले असल्याचे दिसून आले. यावरील लेखापरीक्षणाचे अभिप्राय पुढील प्रमाणे-

वरील शासन निर्णयाप्रमाणे निवड झालेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्तीचा लाभ देणे आवश्यक असतांना, अनुसुचित जातीचे 26 व वि.जा.भ.ज./ विशेष मागास प्रवर्गाचे 11 विद्यार्थी हे सन 2014-2015 मध्ये इयता 10 वी शिकत असून त्यांना सन 2015-2016 मध्ये गुणवत्ता शिष्यवृत्तीचा लाभ मंजूर करण्यात आल्याचे दिसून आले. जेणे की सन 2015-2016 मध्ये सदर विद्यार्थी हे इयत्ता 11वी मध्ये हायस्कुलला शिकत असुन, इयत्ता 10 वी नंतर त्यांनी प्राथमिक / माध्यमिक शाळा सोडून हायस्कूल मध्ये प्रवेश घेतलेला आहे. त्यामुळे त्यांच्या नावे मंजुर असलेली गुणवत्ता शिष्यवृत्तीची रक्कम संबंधित प्राथमिक / माध्यमिक शाळास्तरावर अद्याप पडून आहे. सदर 37 विद्यार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्तीचे वाटप झालेले नसल्याने प्राथमिक / माध्यमिक शाळा स्तरांवर शिल्लक असलेल्या गुणवत्ता शिष्यवृत्तीच्या रक्कमेची शाळानिहाय परिगणना करून रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

**4.68 संगणक अर्हतेबाबत.**

**पंचायत समिती कर्जत, जिल्हा अहमदनगर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 8) -** पंचायत समिती कर्जतचे सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात पंचायत समिती आस्थापनेवरील कर्मचारी हे अदयापपर्यंत एमएससीआयटी ही संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झालेले नसताना किंवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नसताना त्यांना नियमबाहयपणे वेतनवाढी मंजुर करुन अतिप्रदान केले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- प्रशिक्षण/प्र.क्र/5/2001/39, दिनांक 20/07/2002 अन्वये ज्यांची निवड प्रक्रिया 01/01/2001 रोजी किंवा त्यापुर्वी पासून सुरु झालेली आहे अशा गट-अ,गट-ब आणि गट- क मधील सर्व शासकिय व जिल्हा परिषद अधिकारी आणि कर्मचारी यांना संगणक हाताळणीबाबतचे ज्ञान असणेसाठी एमएससीआयटी ही परीक्षा वय वर्षे 50 पुर्ण होण्याच्या आत व शासन निर्धारीत करील त्या विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

2) शासन निर्णय क्रमांक- मागासे/नस्ती-4/224/39,दिनांक 05/07/2007 अन्वये सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी दिनांक 31/12/2007 ही शेवटची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे दिनांक 01/01/2008 पासून पुढे व वय वर्षे 50 पूर्ण होण्याच्या आत जिल्हा परिषद कर्मचा-यांनी एमएससीआयटी संगणक परीक्षा तात्काळ उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा दिनांक 01/01/2008 नंतर दिनांक 01/07/2008 व त्यापुढील दरवर्षीच्या नियत वेतनवाढी रोखणे आवश्यक आहे. तथापि, परिशिष्टातील दिनांक 19/03/2003 पुर्वी नियुक्ती झालेले जे कर्मचारी दिनांक 31/12/2007 पर्यंत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करु शकले नाहीत, त्यांच्या दिनांक 01/07/2008 पासूनच्या वेतनवाढी रोखणे आवश्यक असताना त्यांना दिनांक 01/07/2008 पासूनच्या वेतनवाढी नियमबाहयपणे मंजुर केल्या आहेत.

3) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्रं.61/ 2001/39, दिनांक 19/03/2003 मध्ये नमूद केल्यानुसार दिनांक 19/03/2003 रोजी किंवा त्यानंतर नव्याने नियुक्त होणाऱ्या गट अ,ब,क मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन 2 वर्षाच्या आत संगणक अर्हता प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील. तथापि, खालील नमूद यादी प्रमाणे दिनांक 19/03/2003 रोजी किंवा त्यानंतर नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांनी त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासुन 2 वर्षाच्या आत संगणक अर्हता प्राप्त केलेली नसताना त्यांना नियुक्तीपासून 2 वर्षानंतरच्या पुढील सर्व वार्षिक वेतनवाढी नियमबाहयपणे मंजुर केल्या आहेत.

4) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक सेप्रनि-2000/प्र.क्र. 14/02/12, दिनांक 02/09/2003 अन्वये शासन सेवेतील गट "अ", "ब", आणि "क" मधील वयाची 50 वर्षे पूर्ण केलेल्या शासकीय सेवकास संगणक आर्हतचे प्रमाणपत्र सादर करण्यापासून सूट मिळेल, असे सूचित करण्यात आलेले आहे. तथापि, काही कर्मचा-यांच्या वयास 50 वर्षे पूर्ण झाल्यामुळे, संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात आलेली नाही. तरीही त्यांना सर्व वार्षिक वेतनवाढी मंजुर करण्यात आलेल्या आहेत.

5) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए-2012/प्र.क्र.250/प्रानश-4, दिनांक 01/03/2014 अन्वये प्राथमिक शिक्षक पदासाठी लागणारी अर्हता पूर्ण करणा-या वस्तीशाळा/निमशिक्षकांना दिनांक 01/03/2014 पासून जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये प्राथमिक शिक्षक पदावर सामावून घेण्यात आले असून प्राथमिक शिक्षक पदाचे नियमित वेतन व भत्ते (वेतनश्रेणी 5200-20200, ग्रेड पे 2800) लागू करण्यात आलेले आहेत. सदर शिक्षकांनी नियुक्तीपासून 2 वर्षाचे आत एमएससीआयटी ही संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. अन्यथा उपरोक्त अ.क्र.3 मधील, दिनांक 19/03/2003 मधील शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

तरी आता, पंचायत समिती आस्थापनेवरील सर्व विभागांच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व अधिकारी/ कर्मचारी व शिक्षकांच्या संदर्भात (वाहन चालक व गट ड मधील कर्मचारी वगळता) उपरोक्त अभिप्राय क्रमांक 1 ते 5 मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी व अतिप्रदानाची रक्कम (असल्यास) परिगणित करुन योग्य त्या शासन लेखाशीर्षात भरणा करुन चलनाचे मूळ प्रतीसह अनुपालन लेखापरीक्षणास दर्शविण्यात यावे.

**4.69 माहे 18 सप्टेंबर 2012 ते मार्च 2013 अन्न शिजवुन देणे इंधन अनुदान देयक अदाईतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती खेड, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 36) -** पंचायत समिती, खेड सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये शिक्षण विभागाकडील शालेय पोषण आहार योजनावर रक्कम रूपये 73,61,760/- खर्च केलेली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर अनुदान वितरीत करताना दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 कालावधीत 268 शाळांना 600 लाभार्थीना 1 सिलेंडर करीता रूपये 840/- अनुदान वितरीत करणे आवश्यक असताना लाभार्थी अनुदान शाळांना वितरीत करताना सिलेंडर संख्या पुर्णांकात परिगणित करून अनुदान वाट्प केल्याने शाळांना रक्कम रुपये 16,42,855/- जादा अदाई झालेली आहे.

2) सदर कालावधीत एकूण 268 शाळांकरिता दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीतील प्रत्यक्ष लाभार्थी संख्या/ताटांची संख्या विचारात न घेता सिलेंडर अनुदान वाटप करताना दिनांक 01/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीतील लाभार्थी संख्या/ताटांची संख्या परिगणित करुन अनुदान वाटप केल्याने रक्कम रुपये 17,24,125/- जादा अदाई झालेली आहे. आता जादा अनुदान संबंधीतांकडुन वसुल करुन शासन निधीत भरणा करण्यात यावे.

3**)** दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 कालावधीत शाळांच्या नावे गॅस कनेक्शन असल्याबाबतचे गॅस नोंदणी प्रमाणपत्र व सदर कालावधीत शाळांनी एल पी जी इंधनाव्दारे आहार शिजविला याबाबत गॅस सिलेंडर विकत घेतल्याबाबतचे सिलेंडर भरणा पावत्या लेखापरिक्षणास उपलब्ध केले नाही.

4) दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 कालावधीत वरील प्रमाणकान्वये महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2010/प्रक्र.18/प्राशि-4, दिनांक 02/02/2011 अन्वये इयत्ता 1 ते 5 करीता इंधन, भाजीपाला व पुरक आहार याकरिता स्वयंसेवी संस्था यांना प्रति लाभार्थी रुपये 0.90 पैसे व इयत्ता 6 ते 8 वी रुपये 1.20 प्रमाणे देयके यापुर्वी अदायगी केलेली असताना या प्रमाणकान्वये रकमा अदा केल्याने दुबार अदाई झाली नसल्याबाबतची खात्री पटवावी**.**

5) सदर कालावधीत एकूण 268 शाळांकरीता अनुदान वाटप करण्यात आलेले आहे. त्यापैकी सोबत जोडलेल्या शाळांची दिनांक 18 सप्टेंबर 2012 ते दिनांक 31 मार्च 2013 कालावधीतील प्रत्यक्ष लाभार्थी संख्या लेखा परिक्षणास उपलब्ध न झाल्याने जादा अनुदान अदाई झाली आहे. आता सदर कालावधीतील प्रत्यक्ष लाभार्थी संख्या विचारात घेऊन झालेली जादा अनुदान रक्कम संबंधिताकडुन वसुल करुन शासन निधीत भरणा करण्यात यावी.

6**)** प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य शालेय पोषण आहार योजना पुणे रोख अनुदानाचे ज्ञापन क्रमांक-शापोआ/2014-15/तरतुद/प्राशिस-301/1476, दिनांक 28/03/2015 अन्वये सदर अनुदान दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीत **LPG** गॅस सिलेंडरचा वापर करुन शालेय पोषण आहार शिजविणा-या शाळांनाच उपलब्ध होईल. तसेच शाळांमार्फत सदर अनुदान त्या कालावधीत अन्न शिजविणा-या यंत्रणानांच अदा केले, याबाबतचे तालुक्याचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर करावे.

7) तपासणी करण्यात आलेल्या काही निवडक शाळांकडे सदर कालावधी मध्ये गॅस कनेक्शन नसताना अनुदान अदा केले आहे. आता अदा करण्यात आलेली सिलेंडर अनुदान रक्कम रुपये 2,78,880/- वसुलात आणुन शासन निधीत जमा करुन पुर्तता लेखापरिक्षणास दर्शवावी.

**4.70 दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 अन्न शिजवून देणे इंधन अनुदान देयक अदाईतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती जुन्नर, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 25) -** पंचायत समिती, जुन्नर सन 2015-2016 या वित्तीय वर्षा मध्ये शिक्षण विभागाकडील शालेय पोषण आहार योजना दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 अखेर अन्न शिजवुन देणे इंधन अनुदान रक्कम रुपये 50,44,200/- अदा केलेली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 कालावधीत एकूण 17 प्रमाणकान्वये महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2010/प्रक्र.18/प्राशि-4, दिनांक 02/02/2011 अन्वये इयत्ता 1 ते 5 करिता इंधन, भाजीपाला व पुरक आहार याकरीता बचत गट / स्वयंसेवी संस्था यांना प्रति लाभार्थी रुपये 0.90 (1.12) पैसे व इयत्ता 6 वी ते 8 वी रुपये 1.20 (1.40) प्रमाणे बचत गटांना आहार शिजविण्याकरीता भाजीपाला, इंधन व पुरक आहार इयत्ता 1 ते 5 व व इयत्ता 6 ते 8 करिता 35:35:30 या प्रमाणात परिगणना करुन इंधन अनुदान संबंधीत शाळाना आहार शिजविणा-या बचत गटांना यापुर्वी अदाई केलेली असताना या प्रमाणकांद्वारे प्रति 600 लाभार्थी एक सिलेंडर रक्कम रुपये 840/- परिगणना करुन आदाई केल्याने जादा अदाई झालेली आहे. इंधन अनुदान 0.35 पैसे प्रति लाभार्थी x 600 लाभार्थी = रूपये 210/- इतकी रक्कम प्रति सिलेंडर अनुदान रक्कमेतुन म्हणजेच रक्कम रुपये 840/- मधुन कपात करुन रक्कम रुपये 630 (840 - 210 = 630) प्रति

सिलेंडर प्रमाणे रक्कम रुपये 37,83,150/- अदाई करणे आवश्यक असताना रक्कम रुपये 50,44,200/- अदा केल्याने रक्कम रुपये 12,61,050/- जादा अदाई झालेली आहे.

2) प्राथमिक शिक्षण, संचालनालय, महाराष्ट्र राज्य शालेय पोषण आहार योजना पुणे रोख अनुदानाचे ज्ञापन क्रमांक शापोआ/2014-15/तरतुद/प्राशिस-301/1476, दिनांक 28/03/2015 अन्वये सदर अनुदान दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीत LPG गॅस सिलेंडरचा वापर करुन शालेय पोषण आहार शिजविणा-या शाळांनाच उपलब्ध होईल. तसेच शाळांमार्फत सदर अनुदान त्या कालावधीत अन्न शिजविणा-या यंत्रणानांच अदा केले. या बाबतचे तालुक्याचे प्रमाणपत्र लेखापरिक्षणास सादर करावे.

3) तपासणी करण्यात आलेल्या 15 निवडक शाळांकडे सदर कालावधी मध्ये गॅस कनेक्शन नसताना अनुदान कशाच्या आधारे अदाई केलेली आहे. जादा अदा करण्यात आलेली सिलेंडर अनुदान रक्कम रुपये 2,54,840/- वसुलात आणुन शासन निधीत जमा करणे आवश्यक आहे.

4) प्राप्त अनुदानापैकी अखर्चित अनुदान रक्कम रुपये 8,84,780/- शासन निधीत भरणा करावा.

**4.71 दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 अन्न शिजवुन देणे इंधन अनुदान देयक अदाईतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती बारामती, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 9) -** सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये शिक्षण विभागाकडील शालेय पोषण आहार योजना दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 अखेर अन्न शिजवुन देणे इंधन अनुदान 2 प्रमाणकान्वये रक्कम रूपये 51,92,040/- अदा केलेली आहेत. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सदर अनुदान वितरीत करताना दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 कालावधीत 77 शाळांना 600 लाभार्थींना 1 सिलेंडर करिता रूपये 840/- अनुदान वितरीत करणे आवश्यक असताना लाभार्थी अनुदान शाळांना वितरीत करताना सिलेंडर संख्या पुर्णांकात परिगणित करुन अनुदान वाटप केल्याने शाळांना रक्कम रुपये 32,781/- जादा अदाई झालेली आहे.

2) लेखापरीक्षणास उपलब्ध अभिलेख्यातील प्रपत्र 2 मधील लाभार्थ्यांची दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीतील महिनावर प्रत्यक्ष परिगणना केली असता सोबतचे परिशिष्ट मध्ये नमूद केल्यानुसार रक्कम रुपये 2,93,920/- इतकी जादा अदाई झालेली आहे. लेखापरीक्षणास उपलब्ध न झालेल्या शाळातील प्रपत्र 2 मधील लाभार्थ्यांची परिगणना करुन जादा अनुदान वाटपाची रक्कम वसूल करुन शासन सदर भरणा करावी.

3) दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 कालावधीत शाळांच्या नावे गॅस कनेक्शन असल्याबाबतचे गॅस नोंदणी प्रमाणपत्र व सदर कालावधीत शाळांनी एल पी जी इंधनाद्वारे आहार शिजविला, याबाबत गॅस सिलेंडर विकत घेतल्याबाबतचे सिलेंडर भरणा पावत्या लेखापरिक्षणास उपलब्ध न केल्याने उपरोक्त कालावधीत किती सिलेंडर भरणा केले व त्याप्रमाणे अनुदान वाटप केल्याची खात्री करता आली नाही.

4) दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 कालावधीत वरील प्रमाणकान्वये महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2010/प्रक्र.18/प्राशि-4, दिनांक 02/02/2011 अन्वये इयत्ता 1 ते 5 करीता इंधन, भाजीपाला व पुरक आहार याकरिता स्वयंसेवी संस्थाना प्रति लाभार्थी रुपये 0.90 पैसे व इयत्ता 6 ते 8 वी रुपये 1.20 प्रमाणे देयके यापुर्वी अदायगी केलेली असताना या प्रमाणकान्वये रक्कमा अदा केल्याने दुबार अदाई झाली नसल्याबाबतची खात्री पटवावी.

5) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य शालेय पोषण आहार योजना पुणे रोख अनुदानाचे ज्ञापन क्र.शापोआ/2014-15/तरतुद/प्राशिस-301/1476, दिनांक 28/03/2015 अन्वये सदर अनुदान दिनांक 18/09/2012 ते दिनांक 31/03/2013 या कालावधीत LPG गॅस सिलेंडरचा वापर करुन शालेय पोषण आहार शिजविणा-या शाळांनाच उपलब्ध होईल. तसेच शाळांमार्फत सदर अनुदान त्या कालावधीत अन्न शिजविणा-या यंत्रणानांच अदा केले, याबाबतचे तालुक्याचे प्रमाणपत्र लेखा परिक्षणास सादर करावे. वरील प्राप्त अनुदानापैकी अखर्चित अनुदान शासन निधीत भरणा करावा.

**4.72 शालेय पोषण आहारातील तांदुळ नियतनाबाबत.**

**पंचायत समिती भोर, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 6) -** पंचायत समिती भोर अंतर्गत सन 2015-2016 मध्ये 466987 किलो तांदूळ प्राप्त झालेला असून 29063 किलो तांदुळ शिल्लक असल्याचे लेखापरीक्षणात दिसून आलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मोठया प्रमाणावर तांदूळ शिल्लक असल्याने योजनेचा लाभ लाभार्थ्यांना आवश्यक प्रमाणात उपलब्ध करुन दिला किंवा कसे, याबाबत संभ्रम निर्माण होतो. तेंव्हा एकूण लाभार्थ्यांच्या 80 टक्के नियतनाची मागणी करणे आवश्यक असतांना मोघम नियतमानाची मागणी केल्याचे दिसून येते. शिल्लक तांदूळाचा सांभाळ करतांना तांदूळ साठयाबाबत किटकनाशकांची काळजी घेतल्याबाबत कार्यवाही केलेली नाही. शालेय पोषण आहाराच्या तांदूळाच्या एकूण मागणी आणि खर्चामध्ये तफावत राहील्याने मोठया प्रमाणात तांदूळ शिल्लक राहील्याचे दिसते. शिल्लक तांदूळाच्या साठ्याची आवश्यक ती काळजी न घेतल्याने लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. साठा केलेल्या तांदूळावर बुरशीजन्य रोग पडण्याची शक्यता आहे. याबाबत काळजी घेतलेली नाही.

**4.73 मुळशी विकास गटातील मोजे आंबवणे गटासाठी डस्टबीन खरेदीतील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती मुळशी, जिल्हा पुणे, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13)** - मुळशी विकास गटातील मौजे आंबवणे गटासाठी डस्टबीन खरेदीसाठी रक्कम रुपये 23,24,140/- खर्च नोंदविला असून लेखापरीक्षणामध्ये आढळून आलेल्या अनियमिततेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) पंचायत समितीने 13 वा वित्त आयोगातून मे.प्रियांका एन्टरप्रायजेस पुणे यांचेकडून डस्टबीन खरेदी केलेल्या आहेत. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम 1958 मधील 63 ची सुधारणा क्रमांक 12, दिनांक 01/05/2006 नुसार रूपये 1,00,000/- पर्यंतच्या रकमेस रुपये 100/- चे मुद्रांक शुल्क व त्यापुढील प्रत्येक 1.00 लाखास रुपये 100/- प्रमाणे मुद्रांक वसुल करणेस दर्शविले आहे. आदेशावरील अटी व शर्त क्रमांक 2 नुसार पुरवठा आदेश प्राप्त झाले नंतर सात दिवसाचे आत रक्कम रुपये 500/- चे स्टॅम्प पेपरवर सदर साहित्य बाबतचा करारनामा करुन दयावे, असे नमुद केलेले आहे. वरील नमुद नियमानुसार रक्कम रुपये 23,24,140/- च्या रकमेवर रक्कम रुपये 2,400/- चे मुद्रांक शुल्क वसुल करणे आवश्यक आहे. तसेच अटी व शर्तीमधील अट क्रमांक 2 नुसार रुपये 500/- चा स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन दयावा, असे नमुद केलेले आहे. तरी रुपये 500/- च्या स्टॅम्प पेपरवर करार नामा करावा. याबाबत कोणते निकष लावण्यात आले, याचा खुलासा करावा. तसेच आदेशातील अटीनुसार नस्तीसोबत पुरवठादाराचे 500/- रुपये स्टॅम्प पेपरवर करारनामा केल्याचे दिसून आले नाही.

2) पंचायत समितीने पुरवठा आदेश व पुरवठा केलेल्या पावत्याची तपासणी केली असता 1 ला पुरवठा आदेश दिनांक 22/09/2015 ला दिलेले असून मालाचा पुरवठा दिनांक 28/10/2015 रोजी झाला आहे. पुरवठा आदेशातील अट क्रमांक 3 नुसार ई निविदा साहित्याचे वर्णनानुसार पुरवठा आदेश मिळालेपासून साहित्याचा पुरवठा 8 दिवसाच्या आत करण्यात यावा असे स्पष्ट नमुद असतांना पुरवठादाराने दिनांक 28/10/2015 ला पुरवठा केल्याचे पोच पावतीवरुन दिसून येते. म्हणजे एक महिना उशिराने पुरवठा केलेला आहे. ई निविदेतील अट क्रमांक 12 मधील (अ) नुसार पुरवठादाराने विहीत कालावधीत पुरवठा न केल्यास पुरवठा करणे कामी बाकी असलेल्या साहित्याच्या किंमतीच्या अर्धा टक्का प्रती आठवडा या दराने दंड आकारणेत येईल व तो पुरवठा देयकामधुन वसुल करणेत येईल, असे स्पष्ट नमुद आहे. या नुसार पुरवठादाराने पहिल्या आदेशानुसार पुरवठा हा एक महिना म्हणजे 4 आठवडे उशिराने केले आहे म्हणजे रुपये 11,24,760/- अर्धा टक्के प्रमाणे प्रति आठवडा 5624 प्रमाणे 4 आठवडयासाठी रक्कम रुपये 22,496/- दंड वसुल करणे आवश्यक आहे. तशी कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तरी 4 आठवडे मालाचा पुरवठा उशिराने केलेबाबत ठेकेदाराकडुन रक्कम रुपये 22,496/- वसुलात आणावे.

**4.74 शालेय पोषण आहार योजना सन 2015-16 मधील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती खंडाळा, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** शालेय पोषण आहार योजनेकरीता सन 2015-2016 मध्ये पंचायत समिती खंडाळा यांनी स्वयंपाकी मदतनीस मानधन व भाजीपाला,

इंधन इत्यादी करीता रक्कम रूपये 74,15,796/- व शिक्षक, लिपीक मानधन भांडी इत्यादी साहित्य व स्टेशनरी करीता रक्कम रूपये 4,09,525/- एकूण रक्कम रूपये 78,25,321/- खर्च केला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) या योजनेसाठी तांदूळ पुरवठा बाबतची विहीत नमुन्यातील प्रपत्रांचा मेळ घेतला असता 1 ते 5 व 6 ते 8 मध्ये एकूण 11.38 क्विंटल तफावत आढळून आली.

उपरोक्त तफावतीमुळे तांदूळ पुरवठयापोटी जिल्हा परिषदेने केलेले प्रदान योग्य झालेले नाही. त्यामुळे तांदूळ पुरवठा योग्य झाला असून विद्यार्थ्यांना निकषाप्रमाणे योग्य पोषण मुल्याचा आहार मिळत असल्याचे प्रमाणित होत नाही.

2) शालेय पोषण आहाराबाबतचे मानधन व इंधन इत्यादी खर्च हा प्रत्यक्ष अन्न शिजवल्यानंतरच्या अहवालानुसार प्रदान केले जाते. या पध्दतीनुसार महिना पुर्ण झाल्यानंतर अहवाल प्राप्त होऊन त्यापुढील महिन्यात अथवा अनुदानाच्या उपलब्धतेनुसार प्रदान केले जाते. मात्र माहे मार्च, 2016 या महिन्याचे देयक एकूण रक्कम रूपये 7,86,926/- त्याच महिन्यात खर्च झाले आहे.

माहिती संकलनाबाबतचे केंद्रनिहाय “प्रपत्र - ब” यावर प्राप्त दिनांक नमूद नाही. तसेच दिनांक 31/03/2016 चे मध्यान्ह आहारानंतर सदर माहिती शाळानिहाय केंद्राकडून प्राप्त होऊन त्याच दिनांकास देयक गोषवाऱ्यासह तयार होऊन, परिगणना होऊन त्याच रोजी त्याचे प्रमाणक खर्च होणे ही भौतिकदृष्टया अशक्यप्राय गोष्ट आहे. सबब यासाठी प्राप्त अनुदान खर्च होण्याच्या हेतूने सदर प्रमाणकाव्दारे खर्च नोंदविला आहे. त्यामुळे खर्च विनियोग प्रमाणित होत नाही.

नमूद खर्चासाठी प्रमाणक तयार करणेकरीता शालेय पोषण आहाराचे देयक तयार करण्यासाठी केंद्र शाळांकडून प्राप्त ज्या “प्रपत्र - ब” चा आधार घतला जातो. ती तयार करुन सादर केल्याचा दिनांक तसेच पंचायत समितीस प्राप्त दिनांक यापैकी कोणतीही नोंद केली जात नाही. तसेच शाळांकडील शालेय पोषण आहार नोंदवही क्रमांक 2 मधील विहीत “प्रपत्र - ब” ची एक प्रत सादर करणे आवश्यक असतांना शाळांव्दारा हस्तलिखीत अथवा टंकलिखीत स्वरुपात सादर केली जाते. तथापि पंचायत समिती याप्रकारे माहिती स्विकारत असल्याने नोंदवहीत नोंदी केल्या जात नाहीत. यासाठी प्रपत्रे प्राप्त व प्रदान नोंदवही ठेऊन त्यात क्रमनिहाय नोंदी घेणे आवश्यक आहे. ज्यायोगे देयके वेळेवर प्रदान करण्याबाबत नियंत्रण ठेवता येईल.

3) “प्रपत्र ई-2” नुसार माहे मार्च, 2016 अखेर पुढीलप्रमाणे तांदूळ शिल्लक आहे.

इयत्ता 1 ली ते 5 वी - 134.409 क्विंटल

इयत्ता 6 वी ते 8 वी - 3.00 क्विंटल

उपरोक्त शिल्लक दोन्ही गटांचे गुणोत्तर प्रमाण 2:98 असे अत्यंत व्यस्त आहे. वास्तविक विद्यार्थी पटसंख्या व सरासरी उपस्थिती या आधारे तांदुळ निकषाप्रमाणे दोन्ही गटांची मागणी, वापर व शिल्लक हे प्रमाण वाजवी असणे शक्य असताना वरील तफावतीमुळे शालेय पोषण आहार व्यवस्थापन प्रक्रिया सदोष असल्याचे दिसते. माहे एप्रिल, 2016 च्या मध्यानंतर शालेय सुट्टी जवळपास दीड महिना असल्याने शिल्लक तांदुळ खराब झाल्याची शक्यता आहे. खराब तांदुळाबाबत काही शाळा, शालेय व्यवस्थापन समिती विशेषत: खाजगी शाळा यांनी सडलेला तांदुळ, धान्यादि माल इत्यादी बदलून देण्याची मागणी नोंदविल्याचे आढळले आहे. उदा. राजेंद्र विद्यालय, खंडाळा यांचे पत्र जा.क्र.95/2015-16, दिनांक 14/08/2016 अन्वये माहे जून/जुलै, 2015 मध्ये प्राप्त 322.530 किलो हरभरा पुर्णपणे किडलेला आहे व कमी करुन बदलून मिळणेस विनंती केली आहे. याबाबत शासनाव्दारा शालेय पोषण आहारासाठी मार्गदर्शक सुचनांप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक शापोआ/शिक्षण/प्राथ/772/09, दिनांक 15/09/2009 नुसार योजनेसाठी तांदुळ मिळाला नाही. यामुळे विद्यार्थी आहारापासुन वंचित राहु नये, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. तथापि, शालेय पोषण आहार शिजविलेल्या दिवसांपैकी काही शाळांमध्ये विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित आहेत. याबाबत संयुक्तिक कारणासह पुर्तता आवश्यक आहे.

5) माहे मार्च, 2016 केंद्रनिहाय “प्रपत्र ब” व्दारे दर्शविलेली विद्यार्थी संख्या व त्यापोटी उपरोक्त अनुक्रमांक 2 मध्ये नमूद प्रमाणकाद्वारे खर्च देयकामध्ये दर्शविलेली विद्यार्थी संख्या यात केंद्र खेड बु. व केंद्र लोणी येथे तफावत आढळून आली आहे. यावरुन शालेय पोषण आहाराच्या नोंदी योग्यरित्या झाल्या नसून त्यासाठी प्रदान योग्य झाल्याचे प्रमाणित होत नाही.

**4.75 स्वयंपाकी तथा मदतनिस मानधन वाटपातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती महाबळेश्वर, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती महाबळेश्वर शालेय पोषण आहार विभागाकडील देयकांची तपासणी करता त्यामध्ये अनियमितता दिसून आल्या. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासकीय आश्रमशाळा गोगवे यांना प्रतिमहा रुपये 2,000/- प्रमाणे स्वयंपाकी मानधन दिले जात असून सदर शाळा ही निवासी आश्रमशाळा असलेने तेथे स्वयंपाकी, मदतनीस ही पूर्णवेळ पदे आहेत व त्यांनीच पोषण आहार शिजविण्याचे काम करणे अपेक्षित असल्याने स्वतंत्र मानधन अनुज्ञेय करता येणार नाही. सन 2012-13 पासून संबंधीत शाळेस अदा केलेली मानधनाची रक्कम रुपये 80,000/- शाळेच्या पोषण आहार बँक खात्यावर शिल्लक असून ती तात्काळ परत घेणे आवश्यक आहे.

2) नगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळांना स्वयंपाकी तथा मदतनिस मानधन अनुज्ञेय नसून केवळ अंजुमन प्राथमिक शाळा, महाबळेश्वर व अंजुमन माध्यमिक शाळा, महाबळेश्वर वगळता अन्य कोणत्याही शाळेस ते दिलेले नाही. संबंधीतास कोणत्या आधारे देणेत आले याबाबत साधार खुलासा करावा अन्यथा अदा रक्कम प्रतिमहा रुपये 5,000/- (प्राथमिक 2,000/-, माध्यमिक 3,000/-) प्रमाणे सन 2014-2015-2016 मधील एकूण रक्कम रुपये 1,00,000/- वसूलात आणणे आवश्यक आहे.

**4.76 तालुक्यातील प्राथमिक शाळांना एल.सी.डी. प्रोजेक्टर पुरविणे.**

**पंचायत समिती जावली-मेढा, जिल्हा सातारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदर बाबत रक्कम रूपये 2,39,750/- खर्च करण्यात आला असून याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) उपरोक्त तपशिल पाहता प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेपूर्वीच जाहिरात दिलेली आहे**.** सबब सदर बाब नियमबाहय आहे**.**

2) निविदा जाहिरात पाहता निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दिनांक 19/03/2016 होती**.** प्राप्त दरपत्रके पहाता दरपत्रकाचे लखोटे कोणत्या दिनांकास व वेळेस प्राप्त झाले याबाबत नोंदी नाहीत. त्यामुळे ते विहीत वेळोत प्राप्त झाल्याबाबत पडताळणी करता आली नाही. तसेच प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेपूर्वीच नियमबाहयपणे निविदा प्राप्त केल्या आहेत. सदर बाब गंभीर असून लेखासंहिता व शासन आदेशाचा भंग करणारी आहे.

3) इप्सन प्रोजेक्टर 7 नग, प्रोजेक्टर स्क्रीन 7 नग शालेय वाटपासाठी कोणत्या शाळेत आवश्यक आहेत. त्याबाबत मागणी पत्रे उपलबध नाहीत. त्यामुळे मागणीविना साहित्याचा पुरवठा केलेला आहे.

4) जंगम मालमत्ता नोंदवही पान क्रमांक 20 पाहता EFSon प्रोजेक्टर जिल्हा परिषद शाळा कोलेवाडी, पार्टेवाडी, भिवडी यांना साहित्य प्राप्त झाल्याची पोहोच प्राप्त नाही. पुर्तता दाखवावी.

5) जंगम मालमत्ता नोंदवही पान क्रमांक 20 पाहता प्रोजेक्टर स्क्रीन जिल्हा परिषद शाळा कोलेवाडी, पार्टेवाडी, केंजळ, भिवडी यांना साहित्य प्राप्त झाल्याची पोहोच प्राप्त नाही. पुर्तता दाखवावी.

**4.77 केंद्रप्रमुखांच्या ताळेबंदामध्ये अखर्चित अनुदान शिल्लक असलेबाबत.**

**पंचायत समिती मिरज, जिल्हा सांगली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 5) -** सन 2015-2016 या वित्तीय वर्षामध्ये पंचायत समिती मिरज, शिक्षण विभागाकडील केंद्र प्रमुखांचे रोकड नोंदवही, ताळेबंद व संबंधित कागदपत्रांचे आधारे तपासणी करीता 14 केंद्रांच्या ताळेबंदामध्ये शासन अनुदान व इतर रक्कमा यांमध्ये एकुण रक्कम रुपये 44,47,683/- अखर्चित शिल्लक असलेचे दिसून येतात. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) वरीलप्रमाणे केंद्रप्रमुखांच्या रोजकिर्दीवर ब-याच कालावधीपासून रक्कमा शिल्लक असल्याचे लेखापरीक्षणास तपासणी अंती दिसून आले आहे. सदर बाब गंभीर आहे.

2) केंद्रप्रमुखांच्या ताळेबंदामध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 नियम 50(2) अन्वये 3 महिन्यातील असंवितरीत रक्कमा त्या त्या लेखाशिर्षाखाली शासन जमा करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता 1968 परिशिष्ठ 7 मधील ताळेबंद विषयाची कार्यपध्दती अवलंबून असंवितरीत रक्कमा शासन लेख्यात भरणा करणे आवश्यक असताना गट शिक्षण अधिकारी यांनी संवितरणाचा ताळमेळ घेवून असंवितरीत रक्कमा त्या त्या लेखाशिर्षात जमा न करता केंद्रशाळेत शिल्लक ठेवल्याने अनियमितता झाली आहे.

**4.78 संगणक अर्हता परिक्षेचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करता वेतनवाढी अदा केल्याबाबत.**

**पंचायत समिती भूदरगड, जिल्हा कोल्हापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 16) -** पंचायत समिती भुदरगड यांचेकडील सन 2015-16 या लेखापरीक्षण कालावधी मध्ये शिक्षण विभाग यांचेकडील सेवा पुस्तकाचे लेखापरीक्षण केले असता, पाच कर्मचा-यांनी संगणक अर्हता परिक्षेचे प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न करुनही त्यांना वेतनवाढी अदा केलेल्या आहेत.

सदर पाच कर्मचा-यांच्या वेतनातून वसूलपात्र रक्कम रुपये 8,19,208/- वसुल करण्यात यावी. सदरचे लेखापरीक्षण हे चाचणी लेखापरीक्षण असून काही निवडक सेवा पुस्तके सन 2015-16 च्या लेखापरीक्षणा दरम्यान तपासण्यात आलेली आहेत. तथापि, उर्वरीत सर्व सेवापुस्तकांची छाननी करून वर नमुद केलेल्या नियमानुसार संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या कर्मचा-यांची वेतनवाढी अदा न करता अदा करण्यात आलेली रक्कम वसूल करण्यात यावी.

**4.79 पंचायत समिती उत्तर शिक्षण विभागाकडील शिक्षक संगणक परीक्षा उत्तीर्ण नसतांना वेतनवाढी चालू ठेवल्याबाबत.**

**पंचायत समिती उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण 2000/प्र.क्र.5/2001/39, दिनांक 20/07/2002 अन्वये ज्यांची निवड प्रक्रिया दिनांक 01/01/2001 रोजी किंवा त्यापूर्वी पासून सुरु झालेली आहे, अशा शासकीय अधिकारी/कर्मचा-यांनी नियुक्तीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत तसेच सध्या शासकीय सेवेत कार्यरत असलेले अधिकारी / कर्मचा-यांनी दिनांक 31/12/2007 पूर्वी परिक्षा उत्तीर्ण न केल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यांना सूट देण्यात येईपर्यंतच्या कालावधीपर्यंत किंवा ते संगणक हाताळणी/वापराबाबतचे विहित प्रमाणपत्र उपलब्ध करून देईपर्यंत वेतनवाढी रोखण्यात पात्र ठरतील व वेतनवाढी रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही असे नमुद केलेले आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मातंसे /नस्ती 04/2/39, दिनांक 05/05/2007 अन्वये शासकीय सेवेतील गट अ, गट ब, गट क मधील अधिकारी / कर्मचा-यांनी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करून शासनास प्रमाणपत्र सादर करण्याची दिनांक 31/12/2007 ही अंतिम मुदतवाढ समजण्यात येईल असे नमुद केलेले आहे.

परंतु, पंचायत समिती उत्तर सोलापूर चे सन 2015 -16 च्या लेखापरिक्षणावेळी शिक्षण विभागाकडील शिक्षकांची सेवापुस्तके तपासली असता बरेच शिक्षक संगणक अर्हता चाचणी परीक्षा उत्तीर्ण नसतांना तसेच, दिनांक 31/12/2007 मुदतीत संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत त्यांच्या वेतनवाढी रोखणे आवश्यक असतांना वेतनवाढी चालू ठेवल्याने त्यांना अतिप्रदान झाले आहे. परिशिष्ठ क्रमांक 17 नुसार एकूण 338 उपशिक्षक/पदवीधर शिक्षक /मुख्याध्यापक संगणक अर्हता चाचणी परीक्षा उत्तीर्ण नसतांना/ दिनांक 31/12/2007 नंतर सदर परीक्षा उत्तीर्ण झाले असताना त्यांच्या वेतनवाढी चालू ठेवल्या आहेत, जे शिक्षक दिनांक 31/12/2007 नंतर संगणक

अर्हता चाचणी परीक्षा उत्तीर्ण झाले आहे. त्यांच्या दिनांक 01/07/2008 ते संगणक अर्हता चाचणी परीक्षा उत्तीर्ण होण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत अतिप्रदान रकमेची वसुली केलेली नाही. तरी आता 338 उपशिक्षक/पदवीधर शिक्षक/मुख्याध्यापक पैकी 55 उपशिक्षक/पदवीधर शिक्षक /मुख्याध्यापक हे अदयाप संगणक अर्हता चाचणी परीक्षा उत्तीर्ण नाहीत. त्यांच्याही वेतनवाढी चालू ठेवल्याने त्यांना आजतागायत अतिप्रदान होत आहे. संगणक अर्हता चाचणी परीक्षा उत्तीर्ण नसतांना तसेच दिनांक 31/12/2007 नंतर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कालावधीपर्यंत अतिप्रदान रकमेची गणना करुन जादा प्रदान वेतनाची वसुली करणे आवश्यक आहे. संगणक परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या उपशिक्षक/पदवीधर शिक्षक /मुख्याध्यापक यांना झालेल्या अतिप्रदान रकमेची वसुली करणेबाबत मागील लेखापरिक्षण अहवालात वारंवार आक्षेप घेवूनही शिक्षण विभाग पंचायत समिती उत्तर सोलापूर यांचेकडून अतिप्रदान रकमेच्या वसुलीबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

**4.80 शिक्षण विभागाकडील शालेय पोषण आहार योजनेंतर्गत डाटाएंट्री ऑपरेटर मानधन खर्चाबाबत.**

**पंचायत समिती मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** शिक्षण विभागाकडील शालेयपोषण आहार योजनेंतर्गत डाटाएंट्री ऑपरेटर मानधनावर रक्कम रूपये 1,15,200/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भाखस-14/प्रक्र-82/भाग-III/उद्योग-4, दिनांक 30/10/2015 मधील 8 नुसार नियम पुस्तिकेच्या परिच्छेद 32 मध्ये खरेदीचे प्रकार नमूद करण्यात आले असून रक्कम रुपये 50,000/- पेक्षा जास्त खरेदी असल्याने जाहिर निविदा मागवून मगच खरेदी करावे असे असताना शिक्षण विभागाने ज्या निविदा मागविल्या आहेत. त्याबाबतची कुठलेही कागदपत्रे नस्तीस लावण्यात आलेले नाहीत. तरी सदरची नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

2) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत डाटाएंट्री मानधनावरील खर्चापोटी सन 2015-2016 मध्ये प्रती महिना रक्कम रुपये 9,600/- प्रमाणे माहे एप्रिल-2015 ते मार्च-2016 अखेर रक्कम रुपये 1,15,200/- इतकी रक्कम ई-टच सेल्स सर्व्हिसेस मंगळवेढा यांना डाटाएंट्री फीडिंग कामी अदा केलेली आहे. परंतु, प्रकरण क्रमांक 520, व 21 दिनांक 31/03/2016 या प्रमाणकास सदर महिन्यात केलेल्या कामाचा अहवाल सादर करण्यात आलेला नसताना देखील त्यांना त्या महिन्याचे देयक रक्कम रुपये 19,200/- अदा करण्यात आलेले आहे. तरी सदरचे देयक कश्यावरून अदा करण्यात आले.

3) वरील नमूद केल्याप्रमाणे शालेय पोषण आहार योजनेंतर्गत डाटाएंट्री फीडिंग कामाचे माहे मार्च, 2016 मानधन प्रकरण क्रमांक 521, दिनांक 31/03/2016 रक्कम रुपये 9,600/- ने अदा केलेले आहे. तरी माहे मार्चचे मानधनची रक्कम माहे मार्च मध्येच कशी काय अदा करण्यात आली. सदरच्या महिन्याचे कामपूर्ण होण्या अगोदरच संबंधीताना रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

**4.81 शालेय पोषण आहाराबाबत.**

**पंचायत समिती मंगळवेढा, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 38) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शिक्षण विभागातील शाळांचे दप्तर तपासले असता असे निदर्शनास आले की 16 शाळांची मागणी असून देखील पुरवठा दराने साहित्याचा पुरवठा केला नसल्याने मुलांना शालेय पोषण आहारापासून वंचित राहावे लागले असल्याचे निर्देशनास आले आहे. तरी सदर पुरवठा दारावर दंडात्मक कार्यवाही झाली किवा कसे तसेच या कालावधीतील रक्कम अदा केली किवा कसे याबाबत सदर खुलासा लेखापरीक्षणास करावा.

**4.82 केंद्रप्रमुख यांना 6 वा वेतन आयोग फरक रक्कमेत जादा अदाईबाबत.**

**पंचायत समिती पंढरपूर, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 13) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

5 व्या वेतन आयोगातील तरतुदीनुसार दिनांक जानेवारी 2006 ते मार्च 2009 या कालावधीत केंद्रप्रमुखांना रुपये 250/- प्रमाणे विशेष वेतन अदा केले आहे. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, क्रमांक सवेआ 1008/ (521/08) माशि-2, दिनांक 12/06/2009 चे सहपत्र जोडपत्रातील सहाव्या वेतन आयोगामधील तरतुदीनुसार दिनांक 01/01/2006 पासून विशेष वेतनाची तरतुद रद्द केली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम 2009 वेतननिश्चिती संबंधी सुचना दिनांक 29/04/2009 नुसार 01/01/2006 ते 31/03/2009 पर्यंतच्या कालावधीतील 39 महिन्याचा वेतन फरक तक्त्यामध्ये 5 व्या वेतन आयोगानुसार अदा केलेले विशेष वेतन दिलेल्या वेतनामध्ये दर्शविणे आवश्यक होते. परंतु अदा केलेले विशेष वेतन दाखविले नाही. त्यामुळे खालील केंद्रप्रमुखांना सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे 6 व्या वेतन आयोग फरक रक्कम रुपये 250 X 39 = 9,750/- जादा अदाई झाली आहे.

1) नाना बाबुराव नाईकनवरे 2) श्री वाघमारे ए.एस 3) श्री एस.आर. मिसाळ 4) नवानाथ सुखदेव मोरे 5) म.पा.पवार 6) बी.एस. शिंदे 7) एस.एस.कांबळे 8) मिरा कृष्ण गायकवाड (पवार) 9) बी.सी.लोंढे 10) ए.आी.लोटके 11) राजाराम मारुती चव्हाण 12) व्ही.सी.मगर 13) के.आर.पठाण 14) एस.टी.मोरे 15) प्रभावती महादेव कोकणे 16) ला.अ. मुलाणी

तसेच उर्वरीत व इतर तालुक्यातुन बदलुन आलेले केंद्रपमुखांचे 6 व्या वेतन आयोगातील फरक तक्ते पडताळणी करुन जादा अदाई झाली असल्यास संबधिताकडून वसुलात आणावी. उपरोक्त जादा वेतन अदाईची रक्कम रुपये 9750 X 16= 1,56,000/- लेखापरीक्षणात अंतीम अमान्य करण्यात येत असून संबंधित केंद्रपमुखांकडून वसुल करुन शासन निधीत भरणा करावी.

**4.83 देय वेतनापेक्षा जादा वेतन प्रदान झालेने अतिप्रदान वसुलीची जबाबदारी निश्चित करणेबाबत.**

**पंचायत समिती माळशिरस, जिल्हा सोलापूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 21) -** पंचायत समिती माळशिरस लेखापरीक्षण वर्ष सन 2015-2016 चे लेखापरीक्षणाकरीता शिक्षण विभागाकडील केंद्र प्रमुखांची सेवापुस्तके व वेतनदेयके यांची पडताळणी केली असता वेतन देयकामध्ये देय रक्कमेपेक्षा जादा रक्कमेचे प्रदान झाले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) 13 केंद्रप्रमुखांच्या सेवापुस्तकात माहे जुलै, 2015 ची वेतनवाढी नोंदविल्या आहेत. वेतनवाढी शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी साक्षांकित केलेल्या नाहीत. वेतनवाढी मंजूर नसताना वेतनदेयके पारीत करण्यांत आली आहेत. सेवापुस्तकात नोंदविलेल्या वेतनानुसार केंद्रप्रमुखांना रुपये 3,50,442/- जादा वेतन अदा केल्याने आर्थिक अनियमितता झालेली आहे.

2) काही केंद्रप्रमुख सेवानिवृत्त देखील झाले आहेत. त्यांचे निवृत्तीवेतन हे सेवापुस्तकात नोंदविलेल्या अखेरच्या वेतनावर झाले आहे. परंतु वेतन देयकांत दर्शविलेल्या जादा वेतनाची वसुली त्यांच्याकडून झाली नाही.

उदा. श्रीमती अनघा अनिल अजोतीकर केंद्रप्रमुख या दिनांक 31/01/2015 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. सेवापुस्तकात माहे जुलै 2014 चे वेतन तसेच त्यांचे सेवानिवृत्ती दिनांकाचे सेवापुस्तकातील वेतन रु 20290+4400 आहे. मात्र वेतनदेयकातील वेतन रुपये 21060+4500 आहे. त्यामुळे त्यांना दिनांक 01/07/2014 ते दिनांक 31/01/2015 या कालावधीत रुपये 13268/- जादा वेतन आदाई झाली आहे. तरी रक्कम रु 13268 सेवानिवृत्ती वेतनातुन वसुल करण्यांत यावी.

3) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक सवेआ 1008/ (521/08) माशि-2 दिनांक 12 जुन 2009 नुसार केंद्रप्रमुखांना रुपये 4400 ग्रेड पे मंजूर असताना रु 4500 ग्रेड पे नियमबाहय आदा केला आहे. त्यामुळे त्यांना रुपये 100 ग्रेड वेतन व त्यावरील अनुज्ञेय भत्ते जादा दराने आदा झाले आहेत.

4) 6 वा वेतन लागू झाल्या पासून शिक्षण विभाग पंचायत समिती माळशिरस येथे केंद्रपमुख पदी सेवेत असलेल्या / बदलुन गेलेल्या / सेवानिवृत्त झालेल्या सर्व केंद्रपमुखांची सेवापुस्तके वेतन पडताळणी पथकाकडून पडताळणी करणेत यावीत. तसेच केंद्रपमुखांना वेतन देयकाद्वारे आदा केलेले वेतनाच्या स्थळप्रती आणि वेतन

पडताळणी पथकाने प्रमाणित केलेले सेवापुस्तकातील वेतन याची अंतर्गत लेखापरीक्षकांकडून तपासणी करुन जादा आदा केलेल्या वेतनाची व्याजासहित वसुली करुन शासन निधीत भरणा करावी.

5) लेखापरीक्षण अहवाल सन 2013-2014 आक्षेप क्रमांक 12 मध्ये सेवापुस्तकातील वेतनापेक्षा जादा वेतन अदा होत असल्याबाबत आक्षेप नोंदवूनही त्याबाबत गटशिक्षणाधिकारी व गटविकास अधिकारी पंचायत समिती माळशिरस यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सदरची बाब अत्यंत गंभीर असून वित्तीय औचित्याची भंग करणारी व कर्तव्यात कसुर करणारी आहे.

**4.84 जिल्हा स्तरीय शालेय खेळ व क्रिडा स्पर्धामधील खर्चातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती चांदुर रेल्वे, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 4) -** सदरबाबत रक्कम रुपये 8,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सर्व तालुकास्तरीय खेळ व क्रिडा स्पर्धा कधी झाल्या याची नस्ती लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही त्यामुळे 14 तालुकास्तरीय खेळ व क्रिडा स्पर्धेतील खेळाडू यांची नियुक्ती जिल्हा स्तरावर झाली याचे अभिलेख नस्तीत कुठेही आढळले नाही.

2) स्थायी समितीचा ठराव लेखापरीक्षणास उपल्बध झाला नाही.

3) सदर खेळ व क्रिडा स्पर्धेमध्ये तालुक्यातील कोणकोणत्या व किती शाळेतील किती मुले सहभागी झाली होती. सदरबाबत नस्ती उपलब्ध झाली नाही.

4) सदर जिल्हास्तरीय खेळ व क्रिडा स्पर्धेकरीता बक्षीसे-शिल्ड इत्यादी व मंडप डेकोरेशन साहित्याची दरपत्रके अनुक्रमाने आवक नोंदवहीत एकाच तारखेला व एकाचवेळी नोंदविलेली आहेत. यावरुन स्पर्धात्मक दरपत्रके मागविण्याची केवळ औपचारीकता पूर्ण केल्याचे सिध्द होते.

5) जिल्हास्तरीय शालेय खेळ व क्रिडा स्पर्धामधील खर्चासाठी जाहिरात दिली तो न्युज पेपर लेखापरीक्षणास उपलब्ध झाला नाही.

6) निविदा प्राप्त झाल्या त्या पाकिटावर दिनांक नमूद नाही व एकाच तारखेत प्राप्त केल्या त्या उघडताना गट विकास अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आल्या नाहीत. निविदा उघडताना त्यावर नियमानुसार कार्यवाही केली नाही. निविदा मंजुरीचे अधिकार गट विकास अधिकारी यांना असताना त्यांचे तुलनात्मक दर तक्तांकनावर कुठेही स्वाक्षरी नाही.

7) निविदा एकच प्राप्त झाल्याचे दिसते. त्यामुळे जाहिरातीचा फायदा झाल्याचे दिसत नाही. महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस/1093/2653/उदयोग-6, दिनांक 16/07/1993 अन्वये रुपये 5,000/- चे वरील खर्चाच्या रक्कमे करीता दरपत्रके मागवितांना खर्च हा जर रुपये 50,000/- मर्यादेपेक्षा जास्त असेल तर जिल्हास्तरीय वर्तमानपत्रात जाहीरात देणे आवश्यक आहे. मात्र अशी कार्यवाही केल्याबाबत लेखापरीक्षणास आढळुन आली नाही.

**4.85 जिल्हा निधी योजना सन 2015-2016 शाळा स्तरावर मैदानी साहित्य खरेदी करण्यातील अनियमिततेबाबत (शासकीय)**

**पंचायत समिती वरुड, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 11) -** जिल्हा निधी योजना सन 2015-2016 शाळा स्तरावर मैदानी साहित्य खरेदी करण्याकरीता रुपये 1,55,000/- खर्च करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शाळांची पडताळणी करतांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे निधी वाटप पत्रानुसार सदर खर्च शाळा स्तरावर मुख्याध्यापक यांनी खरेदी प्रकीयेच्या नियमानुसार करण्यात यावा असे नमुद असतांना सदर शाळांना नियमानुसार साहित्य खरेदीसाठी दरपत्रके बोलावणे आवश्यक असतांना सदर शाळांनी बेरोजगार शशिकांत बहु उददेशिय मागासवर्गीय संस्था मर्यादित यांचेकडून सदर साहित्य खरेदी करण्याकरीता दरपत्रके न मागविता नियमबाहयपणे खर्च केलेला आहे.

2) महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक भांखस 2014प्र.क्र.82/भाग-3/ उद्योग-4, दिनांक 30/10/2015 अन्वये रुपये 5,000/- च्या वरील खरेदी करीता दरपत्रक मागवुन वाजवी बाजार भावानुसार खरेदी करणे बंधनकारक असूनही नियमाप्रमाणे साहित्य खरेदी प्रक्रिया पार पाडण्यात आली नाही.

3) सदर साहित्य बेरोजगार शशिकांत बहुउददेशिय मागासवर्गीय संस्था मर्यादित यांचेकडून खरेदी करण्याचे प्रयोजन काय होते. सदर संस्थेकडुन साहित्य खरेदी करण्यासाठी निवड कोणत्या आधारे करण्यात आली याबाबतचे अभिलेखे लेखापरीक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

4) सदर संस्था ही क्रीडा साहित्य पुरवठा करणारी प्रमाणित संस्था आहे. याबाबत अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

5) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति लेखासंहीता 1968 मधील नियम 83 (3) नुसार गट विकास अधिकारी यांनी प्रत्यक्ष साहित्य खरेदी करण्यापुर्वी साहित्याची पडताळणी केली नाही.

**4.86 मंजूर पदे नसतांना वेतन व भत्यावर केलेल्या नियमबाहय खर्चाबाबत (शासकीय**)

**पंचायत समिति तिवसा, जिल्हा अमरावती, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** पंचायत समिति तिवसा अंतर्गत शिक्षण विभागाचे पगार देयकाची पडताळणी केली असता असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुले तिवसा या शाळेवर श्री. बाबुराव टिकारामजी ठाकरे व प्राथमिक मराठी शाळा तळेगाव ठाकूर मुले या शाळेवर विजय नथ्थुजी लोणकर या दोन शिपायांची पदे दर्शवून शिक्षकांचे वेतन देयकात शाळार्थामध्ये वेतन व भत्ते काढण्यात येत आहे. सदरची पदे ही मंजूर कृती आराखडयात समाविष्ट असल्याबाबतची कोणतेही अधिकृत अभिलेखे विभागाकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे संबंधीतांचे वेतन व भत्त्यावर रकमा कशाच्या आधारे खर्ची टाकत आहे. याबाबत पडताळणी करता आली नाही. सदरची पदे ही जर प्रत्यक्षात मंजूर नसल्यास त्यांचे वेतन व भत्यावर झालेल्या खर्चाबाबतची जबाबदारी निश्चीत होणे क्रमप्राप्त ठरते.

**4.87 शालेय पोषण आहार खर्चातील अनियमितता.**

**पंचायत समिति पांढरकवडा, जिल्हा यवतमाळ, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 7) -** सदरबाबत रक्कम रुपये 15,72,959/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शालेय पोषण ही आहार योजना इयत्ता 1 ते 8 वीच्या विदयार्थांसाठी राबविण्यात येते. यायोजने अंर्तगत इयत्ता 1 ते 5 च्या विदयार्थांसाठी 450 उष्मांक आणि 12 ग्रॅम प्रथिने युक्त आहार, तसेच इयत्ता 6 वी ते 8 वीच्या उच्च प्राथमिक वर्गातील विदयार्थांसाठी 700 उष्मांक आणि 20 ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्याची योजना असुन यायोजने अंतर्गत केंद्र शासनाकडुन प्रतिदिन प्रती विदयार्थी प्राथमिक वर्गासाठी 100 ग्रॅम तांदुळ पुरविण्यात येतो व उच्च प्राथमिक वर्गातील विदयार्थांसाठी 150 ग्रॅम तांदुळ पुरविण्यात येतो. या तांदुळापासुन शालेय पोषण आहार तयार करण्यासाठी शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ 2012/प्र.क्र.333 प्रशि 4, दिनांक 17/08/2012 अन्वये प्राथमिक 1 ली ते 5 वी करिता दर 3.02 प्रतिदिन प्रति लाभार्थी व उच्च प्राथमिक 6 वी ते 8 वी करिता दर 4.47 प्रमाणे प्रदान करण्यात यावे असे शासन निर्णयात नमुद केलेले आहे.

1) प्रत्यक्षात माहे ऑक्टोंबरचे शालेय पोषण आहार व पुरक आहार मानधन देयके तपासले असता शाळा मोहदा येथील 1 ली ते 5 च्या विदयार्थांची संख्या 162 असुन माहे ऑक्टोंबरचे कार्यात्मक दिवस 22 असताना एकूण पटावरील विदयार्थाची उपस्थिती संख्या माहे ऑक्टोबर मध्ये 3564 यायला हवी होती, पण ती संख्या 3597 दर्शविली आहे. अशा प्रकारे 33 जादा लाभार्थी दर्शवुन प्रतिदिन ग्रामीण भागाच्या दराने परिगणीत केले असता प्रदान केलेली जादा रककम रुपये 11,106/- वसुल करणे आवश्यक आहे.

2) माहे ऑक्टोंबर व नोव्हेंबर मध्ये वर नमुद केलेल्या शाळेतील पटावरील प्रत्यक्ष संखेपेक्षा जादा दर्शविलेली विदयार्थी संख्या 8449 ने अधिक आहे. या जादा दर्शविलेल्या विदयार्थी संख्येवरील रक्कम रुपये 25,515/- वसुल करणे आवश्यक आहे.

3) बाब क्रंमाक 5 अनुसार या योजनेमध्ये ग्रामीण भागात पुरवठाधारका मार्फत शाळेत पुरविण्यात येणाऱ्या वस्तुचा वापर करुन शालेय पोषण आहार तयार करण्यात यावा. त्यासोबत इतर वस्तु पालक, टोमॅटो, मेथी, बटाटे, कांदा, लसुण इत्यादी स्थानिक बाजारात मिळणाऱ्या वस्तूंचा वापर करुन आहार चविष्ट बनवावयाचा आहे. याबाबत मुख्याध्यापकाने प्रत्येक महिन्याला आवश्यक त्या भाजीपाल्याचा समावेश केल्याबाबत आहार चविष्ट असल्याबाबतची खात्री करून अन्न शिजवणाऱ्या यंत्रणेस प्रमाणपत्र दयावयाचे आहे त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही.

4) शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोवा 2012/प्र.क्र.484/प्रंशि4, दिनांक 14/05/2012 शालेय पोषण योजनेअंतर्गत केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार विदयार्थांना मध्यान्ह भोजनाबरोबर other health intervation देण्याची तरतुद आहे. त्याप्रमाणे 1 ली ते 5 वीच्या मुलांना other health intervation देण्यांत आले नाही.

5) उच्च प्राथमिक वर्गातील 6 वी ते 8 वी विदयार्थांना iron and folic acid supplyment द्यावयाचे आहे. त्या प्रमाणे कार्यवाही केली नाही.

**4.88 मृत सेवानिवृत्त कर्मचा-याच्या खाती रक्कम जमा करणेबाबत.**

**पंचायत समिती हिंगणा, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 15) -** सदरबाबत रक्कम रुपये 32,49,876/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

प्रमाणक क्रमांक 579, दिनांक 02/11/2015 रक्कम रुपये 32,49,876/- पंचायत समिती हिंगणा येथील सन 2015-2016 या आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षणात शिक्षण विभागाचे सेवानिवृत्त कर्मचा-यांचे हयातीचे दाखल्यांची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आली.

श्रीमती मैनाबाई कामडी यांचे हयातीचा दाखला लेखापरीक्षणाचे वेळी सादर करण्यात आला नाही. याबाबत अर्धसमास पत्र क्रमांक 5, दिनांक 03/08/2016 नुसार हयातीच्या दाखल्याची मागणी केली असता सदर कर्मचारी दिनांक 11/09/2015 ला मृत्यु झाल्याचे सांगण्यात आले. तरी सुध्दा संबंधिताच्या खात्यावर दरमहा रुपये 6,139/- प्रमाणे माहे सप्टेंबर 2015 ते जानेवारी 2016 पर्यंत पाच महिन्याची रक्कम रुपये 30,695/- एवढी रक्कम जमा करण्यात आली आहे. दरवषी नोंव्हेंबर महिन्यात सेवानिवृत्त कर्मचा-यांकडून हयातीचे दाखले घेणे बंधनकारक असतांना सुध्दा श्रीमती मैनाबाई कामडी हयांचेकडून हयातीचा दाखला न घेतल्यामुळे शासन निधीची हानी झाली आहे. त्यामुळे रक्कम रुपये 30,695/- अंतिम अमान्य करण्यात येत आहे.

**4.89 खेळणी साहित्य खरेदीवरील खर्चाबाबत.**

**पंचायत समिती मौदा, जिल्हा नागपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1) -** सदरबाबत रक्कम रुपये 1,00,000/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) योजनेस प्रशासकीय मंजूरी व तांत्रिक मंजूरी दिल्याबाबतचे आदेश नस्तीत नाहीत.

2) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे वरील दिनांक 31/03/2015 रोजीच्या आदेशात योजनेचा खर्च दिनांक 31/03/2015 पूर्वी करावा अशा सुचना आहेत. परंतु खर्च प्रत्यक्षात नंतर म्हणजे दिनांक 04/03/2016 रोजी करण्यात आलेला आहे.

3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांचे वरील दिनांक 31/03/2015 रोजीच्या आदेशात, उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे अशा सुचना आहेत. परंतु उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही.

4) तीन कंपन्यांचे दरपत्रके मागविण्यात आलेत. परंतु ते आवक नोंदवहीत नोंदवून त्यावर आवक क्रमांक व दिनांक नमुद न करता कार्यवाही करण्यात आली.

5) साहित्य पुरविण्याबाबत पुरवठादाराला पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. परंतु त्यात साहित्य पुरवठा करण्याचा कालावधी, इतर अटी व शर्ती याबाबत कोणताही उल्लेख नाही.

6) मेसर्स अॅक्यूलाईट टेक, नागपूर या कंपनीला साहित्य पुरविण्यासाठी दिनांक 31/12/2015 रोजी पुरवठा आदेश देण्यात आला. परंतु सदर कंपनीने दिनांक 28/12/2015 रोजी अगोदरच बिल कसे काय दिले. तसेच एकाच

प्रदानाचे सदर कंपनीचे बिल क्रमांक 141 प्रमाणकासोबत व बिल क्रमांक 143 नस्तीसोबत आहे. एकाच कंपनीचे एकाच कामाचे दोन वेगवेगळया क्रमांकांची उपप्रमाणके कशी याबाबत खुलासा करणे आवश्यक आहे.

7) उपप्रमाणक प्रदानासाठी मंजूर करण्यात आलेले नाही. साहित्य पुरवठयाचे देयक प्राप्त झाल्यानंतर प्रथम त्याची तपासणी करून त्यावर प्रदानाकरीता मंजूरी आदेश नमूद करणे आवश्यक आहे आणि त्यानंतरच प्रदान करणे योग्य आहे.

8) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-2009/प्र.क्र.514/ वित्त-09, दिनांक 20/11/2009 नुसार सर्व प्रकारच्या कार्यकरारासाठी करारनामा करणे आवश्यक आहे. परंतु पुरवठादारा सोबत मुद्रांकावर करारनामा करण्यात आलेला नाही.

**4.90 जिल्हा निधी देखभाल दुरुस्ती अनुदान वितरणातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती तुमसर, जिल्हा भंडारा, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 3) -** सदरबाबत रक्कम रुपये 10,19,000 /- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत**.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता 1968 अन्वये जिल्हा परिषद स्तरावर आहरण व वितरणाचे अधिकार मुख्य वित्त लेखा अधिकारी हयाना व पंचायत समिती स्तरावर गटविकास अधिकारी हयांना देण्यात आलेले आहे. परंतु जिल्हा परिषद भंडारा शिक्षण विभागाव्दारे जिल्हा निधीमधून जिल्हा परिषद शाळेतील (मेहगांव, घसारा, धनेगांव, दांवेझरी, डोंगरीबुर्जुग) मुख्याध्यापकांना रुपये 10,19,000/- अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे यांना वरील लेखासंहिता नुसार आहरण व संवितरणाचे अधिकार मुख्याध्यापकांना देण्यात आलेले नाही त्यामुळे सदर कामावर झालेला खर्च हा नियमबाहय ठरतो. जिल्हा परिषद शिक्षण विभागाव्दारे 3.00 लक्षच्या वरील कामांकरीता आवश्यक ई-निविदा टाळण्याकरीता कामाचे तुकडे करुन जिल्हा परीषद शाळांना अनुदान वितरीत केल्याचे दिसुन येते.

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम 1930 व सुधारीत 2011 ची कलम 6 अन्वये लेखा तपासणीस दस्तावेज सादर न करणे व हजर न राहणे ही गंभीर बाब आहे. सदर नियमातील कलम 7 अन्वये दोषी व्यक्तीवर कारवाई करण्याची व रुपये 25,000/- दंडाची तरतुद आहे. परंतु जिल्हा शिक्षण विभागातर्फे जिल्हा परिषद शाळा दावेझरी व धनेगांव यांना अनुक्रमे रुपये 1,23,000/- व 2,50,000/- लक्षचे अनुदान वितरीत करण्यात आले आहे. संबंधीत काम झाले किंवा कसे याबाबत दस्ताऐवजाची मागणी करुनही दस्ताऐवज लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

**4.91 पंचायत समिती गोंदिया शिक्षण विभागास शासकीय रकमेचा केलेला अपहार.**

**पंचायत समिती गोंदिया, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 32) -** याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

अ) पंचायत समिती गोंदिया अंतर्गत शिक्षण विभागाची सन 2015-2016 या आर्थिक वर्षाचे किरकोळ रोखपुस्तक तपासले असता खालील बाबी आढळुन आलेल्या आहेत.

1) श्री. प्रदिप सरोदे, वरिष्ठ सहाय्यक यांनी गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती गोंदिया यांच्या खात्याचा धनादेश क्रमांक 45407,दिनांक 28/01/2016 रुपये 2,25,000/- चा धनादेश गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँक तिरोडा यांचे नावे लिहुन स्वताचे कर्ज खात्यात (श्री.प्रदिप सरोदे यांच्या) रक्कम वळती करुन शासकीय रकमेचा रुपये 2,25,000/- चा अपहार केला हे स्पष्ट आहे.

2) श्री. प्रदिप सरोदे, वरिष्ठ सहाय्यक यांनी धनादेश क्रमांक 45425, दिनांक 20/01/2016 अन्वये रुपये 1,00,000/- स्वत:चे नावे धनादेश लिहुन आपल्या स्वत:चे खाते असलेल्या एचडीएफसी बँकेत जमा करुन रुपये 1,00,000/- रकमेचा अपहार केलेला आहे.

3) पंचायत समिती अंतर्गत शिक्षण विभागाच्या आस्थापनेवर असलेल्या माहे जानेवारी 2016 च्या वेतना संबंधी एचडीएफसी बँकेत धनादेश क्रमांक 45438,दिनांक 15/02/2016 ला रुपये 3,97,206/- जमा केला आहे. श्री.

प्रदिप सरोदे यांचे निव्वळ देय वेतन रुपये 33,463/- असतांना त्यांनी स्वत:च्या वेतनात रुपये 1,00,000/- जादा दर्शवून त्यांच्या खात्यात रुपये 1,33,463/- वेतनापोटी जमा करुन घेतलेले आहे त्यामुळे त्यांनी रुपये 1,00,000/- जादाचे वेतन जमा करुन शासकीय रकमेचा अपहार केला हे स्पष्ट होते.

वरील बाबीवरुन श्री.प्रदिप सरोदे यांनी प्रथमदर्शनी रुपये 4,25,000/- स्वत: व गटशिक्षणाधिकारी यांच्या संगनमताने शासकीय रकमेचा अपहार केला हे स्पष्ट होते.

ब) गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती गोंदिया यांचे बचत खाते स्टेट बँक ऑफ इंडिया मुख्य शाखा गोंदिया येथे आहे. बँक खात्याचे तपासणी केली असता खालील गंभीर बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

1. बँकेनी धनादेश क्रमांक 877186, दिनांक 09/04/2015 ला रुपये 11,114/- खर्च दर्शवून बँक खात्यातून रक्कम कमी केलेली आहे. सदर धनादेश विभागाचा नसतांनी बँकेने खात्यातून रक्कम कमी करण्याचा प्रश्नच उदभवत नाही.

2. बँकेने खात्यात सन 2015-2016 या वर्षात दिनांक 25/06/2015 ला रुपये 56,478/- व दिनांक 25/12/2015 ला रुपये 62,864/ व्याजाची रक्कम जमा केलेली आहे. व्याजाची एकुण रक्कम रुपये 1,19,432/- रोखपुस्तकाच्या जमेस घेण्यात आलेली नाही. शासकीय रक्कम लेख्याबाहेर आहे.

3. शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांनी गटशिक्षणाधिकारी यांना आकस्मित खर्चासाठी धनादेश क्रमांक 628944, दिनांक 11/09/2015 ला रुपये 4,98,000/- चा धनादेश दिला आहे. तो धनादेश गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती गोंदिया चा खात्यात दिनांक 11/09/2015 ला जमा झालेला आहे. परंतु गटशिक्षणाधिकारी यांनी सदरची रक्कम गटविकास अधिकारी पचांयत समिती गोंदिया ला दिल्याचे रोखपुस्तकात दिसुन येते. परंतु दिलेला धनादेश खात्यात रक्कम कमी असल्यामुळे बँकेनी पास केलेला नाही. सदरचा निधी विभागाने कुठे वळती केला याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे.

4. जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा पांजरा यांना त्याचे माहे ऑगष्ट 2015 चे शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद गोंदिया यांचे कडून वेतनाची रक्कम प्राप्त झालेली नसतांना त्यांना धनादेश क्रमांक 45463, दिनांक 11/04/2016 ला रुपये 3,53,552/- रक्कम प्रदान केलेली आहे. वेतनाचे देयक पारीत नसतांना / रक्कम प्राप्त नसतांना रक्कम प्रदान करणे गैरव्यवहार आहे.

5) दिनांक 31/03/2016 बँक खात्यात रुपये 5,19,353/- शिल्लक आहे. परंतु खालील रकमा प्रदान नसतांना त्या रक्कम शिल्लक असणे आवश्यक आहे.

1. आकस्मित खर्चासाठी प्राप्त झालेली रक्कम रुपये 4,98,000/-

2. बँकेनी दिलेले व्याज रक्कम रुपये 1,19,000/-

3. जि.प.हायस्कुल काटी यांनी जमा केलेली रक्कम रुपये 11,74,553/- पैकी अपहार रक्कम रुपये 4,25,000/- वजा करता शिल्लक रक्कम रुपये 7,48,553/- राहते.

बँक खात्यात दिनांक 31/03/2016 ला सर्वसाधारणपणे वरील बाबीं अन्वये एकुण रक्कम रुपये 13,66,553/- शिल्लक असणे आवश्यक असतांना बँक खात्यात रुपये 5,19,353/- शिल्लक असल्यामुळे रुपये 8,47,200/- अपहार झाल्याची शक्यता नाकारता येत नाही.

शिक्षणाधिकारी, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद हायस्कुल काटी यांचे माहे जुलै 2015 चे एकच वेतन देयक दुबार पारित करुन शासन खजिन्यातून रक्कम काढण्यात आलेली आहे. विभागाने अशी किती देयके दुबार पारित करुन रक्कम काढली याची चौकशी होणे आवश्यक आहे. दुबार देयक पारित करुन रक्कम काढली नसती तर शासन निधीचा अपहार झाला नसता असे लेखापरीक्षणाचे स्पष्ट मत आहे. याबाबत विभागाने चौकशी करुन तसा अहवाल या विभागास सादर करावा.

**4.92 सेवा निवृत्तीवेतन धारकांना नियमबाहयपणे जादा प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती सडक अर्जुनी, जिल्हा गोंदिया, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 25) -** सन 2015-2016 मध्ये पंचायत समिती सडक-अर्जुनी येथील लेखापरीक्षणामध्ये सेवानिवृत्ती वेतन धारक यांना निवृत्ती वेतन अदा केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परीपत्रक क्रमांक सेनिवे 2013/प्र.क्र.46/सेवा-4, दिनांक 17/12/2013 अन्वये आदिवासी / नक्षलग्रस्त भागातून दिनांक 01/01/2006 पासुन किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या अधीकारी / कर्मचारी यांच्या निवृत्तीच्या दिनांकास ते ज्या मुळ पदावर कार्यरत आहेत. (एकस्तर पदोन्नती पद वगळून) त्या पदाच्या पे बॅड मध्ये ते घेत असलेले वेतन + अनुज्ञेय ग्रेड वेतनावर निवृत्ती वेतनाची परीगणना करावी. ज्या कर्मचा-यांना अशा परिगणनेनुसार अनुज्ञेय निवृत्तीवेतना पेक्षा जास्त निवृत्ती वेतन अदा करण्यात आलेले आहे. त्या निवत्ती वेतन धारकाकडूनजास्त अदा केलेले निवृत्ती वेतन महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम 1982 मधील नियम 134 ए दिनांक 30/07/2007 नुसार केलेली सुधारणा नुसार वसूली करण्याची कार्यवाही या नियमातील परंतुका प्रमाणे करण्यात यावी.

वरील परिपत्रकात सेवानिवृत्ती वेतन सुधारणा करण्याबाबत जादा प्रदानाची वसूली करण्याबाबत स्पष्ट निर्देश दिलेले असतांना खंडविकास अधिकारी यांनी शासन निर्देशाचे पालन न करता त्याच बाबीची पूनरावृत्ती होत असल्याचे दिसून येते.

**4.93 मंजुर पदापेक्षा अधिक पदे भरुन ज्यादा वेतन प्रदानाबाबत.**

**पंचायत समिती चिमूर, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती चिमुर यांचे सन 2015-16 चे लेखापरीण करते वेळी पंचायत समितीमध्ये आकृतीबंधानुसार मंजुर पदे, भरलेली पदे व रिक्त पदाबाबत प्राप्त माहीतीच्या तपशिलाबाबत खालीप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) सहायक शिक्षकाची एकूण 430 पदे मंजुर असुन एकूण 448 सहायक शिक्षक प्रत्यक्ष कार्यरत असल्याचे विवरणपत्रावरुन दिसुन येते. याचा अर्थ 18 शिक्षक अतिरीक्त असुन त्यांचे वेतन नियमबाहय पध्दतीने प्रदान करण्यात येत आहे. तरी अतिरीक्त शिक्षकांचे तात्काळ समायोजन करण्यात यावे. तोपर्यत 18 शिक्षकांचे वेतनावरील ज्यादा खर्च मान्य करता येणार नाही.

2) मुख्याध्यापक यांची एकूण 22 पदे मंजुर असुन एकूण 47 मुख्याध्यापक प्रत्यक्ष कार्यरत असल्याचे विवरणपत्रावरुन दिसुन येते. याचा अर्थ 25 मुख्याध्यापक अतिरीक्त असुन त्यांचे वेतन नियमबाहय प्रदान करण्यात येत आहे. तरी अतीरीक्त मुख्याध्यापकांचे तात्काळ समायोजन करण्यात यावे. तोपर्यत 25 मुख्याध्यापकांचे वेतनावरील ज्यादा खर्च मान्य करता येणार नाही.

**4.94 शाळांना शैक्षणीक पुस्तके खरेदी व वितरणाबाबत.**

**पंचायत समिती ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** पंचायत समिती ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर येथील सन 2015-2016 या वित्तीय वर्षात शिक्षण विभागाअंतर्गत मिशन नवचेतना निवड केलेल्या शाळांना शैक्षणिक पुस्तके खरेदी व वितरण यांवर रुपये 40,700/- खर्च करण्यात आला असून त्याबाबत पुस्तके खरेदी करुन पुरविल्याबाबत आदर्श ग्रंथालय निमिर्ती यांना रुपये 40,700/- चे शोधन केलेले आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) मिशन नवचेतना अंतर्गत निवड केलेल्या एकुण 11 जिल्हा परिषद प्राथमिक शाळांना रुपये 3,700/- प्रमाणे पुस्तके वाटप करण्यात आलेली आहेत. पुस्तके खरेदी करतांना शैक्षणिक शाळेच्या पुस्तक खरेदीबाबत काही सुट सुध्दा देण्यात येते. असे असतांना संबंधीत पुरवठादाराकडुन अशी कोणतीही सुट देण्यात आल्याचे दिसत नाही. किंवा खरेदी पूर्वी कुठलीही दरपत्रके मागविल्याचे दिसून आले नाही.

2) मिशन नवचेतना योजनेअंतर्गत पंचायत समिती अंतर्गत एवढया जिल्हा परिषद प्राथमिक शाळा असुन नेमक्या 11 शाळांची निवड कशाचे आधारे केली याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे.

3) पुस्तके कोणती खरेदी करावयाची आहेत. याबाबत शाळेकडुन कोणतीही मागणीपत्र मागविण्यात आल्याचे दिसत नाही. सदर शैक्षणिक पुस्तकांचा विनियोग तथा फलश्रृती अहवाल वेळोवेळी मागविण्यात आल्याचे दिसत नाही. त्यामुळे योजनेचा उद्देश सफल झाल्याची खात्री करता येत नाही.

**4.95 आयकर परिगणाबाबत. (शिक्षण विभाग व (प्राथमिक आरोग्य केंद्र) तळोदी (बा).)**

**पंचायत समिती नागभीड, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 1 व 2) -** सन 2015-2016 मध्ये शिक्षण विभागातील शिक्षकांचे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, तळोदी बाळापूर येथील वेतन देयकांची तपासणी केली असता त्यामध्ये 6 व्या वेतन आयोगाच्या हप्त्यांच्या रक्कमेची परिगणणा आयकर नमुना-16 मध्ये करण्यात आलेली नाही. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

सन 2015-2016 चे लेखापरिक्षणास पंचायत समिती, नागभिड येथील शिक्षण विभागातील शिक्षकांचे वेतन देयके, 6 व्या वेतन आयोगाची थकबाकीची देयके व आयकर गणनापत्रक यांची तपासणी केली असता आयकर विवरणपत्र नमुना-16 मध्ये 6व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या रक्कमांची परिगणना नमुना-16 मध्ये करण्यात आलेली नाही. आयकर नियमाप्रमाणे वेतन व भत्याच्या रक्कमा ज्या 31 मार्च पर्यन्त प्राप्त झाल्या आहे किंवा जमा झालेल्या आहे. त्यांची परिगणना नमुना-16 मध्ये करुन त्यावर आयकर आकारावा लागतो. असे असतांना थकबाकीच्या रक्कमांची परिगणना करण्यात न आल्यामुळे 118 शिक्षकांची व एका प्रा.आ.केंद्र, तळोधी (बा) येथील कर्मचा-याची आयकराची कमी कपात केली असल्यामुळे रक्कम रुपये 7,64,990/- ही वसुलपात्र ठरते.

**4.96 शिक्षकाने सादर केलेल्या रजा प्रवास सवलतीमधील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 20) -** रजा प्रवास सवलतीचे एकूण 215 देयके 09/11/2015 ला एकाच दिवशी मंजूर करून रक्कम रूपये 11,18,747/- खर्च करण्यात आला आहे.

1) ज्या शिक्षकांनी महाराष्ट्र दर्शनाचे प्रवास भत्ता देयक सादर केले ते शिक्षण विभागात व वित्त विभागात कधी सादर केले त्या बाबत आवक नोंद वहीला नोंद घेणे आवश्यक आहे. अशी नोंद सादर करण्यात आली नाही.

2) सर्व शिक्षकांनी 24/10/2014 ते 30/10/2014 एकाच दिवशी महाराष्ट्र दर्शनासाठी अर्ज केला व संवर्ग विकास अधिका-याने मंजूर केला. मागणी केलेले अर्ज पहावयास मिळाले नाही.

3) ब-याच शाळेतील सर्व शिक्षकांना एकाच वेळी जर रजा मंजुर करण्यात आली तर शाळेतील विद्यार्थ्यांच्या वर्गाचे काय नियोजन करण्यात आले.

4) एकुण 91 शाळा पैकी 67 शाळेतील शिक्षकांना महाराष्ट दर्शन मंजूर करण्यात आले आणि देयकाचे शोधन करण्यात आले तर वर्षभरात उर्वरीत शाळेतील शिक्षकांचे रजा प्रवास सवलत मंजुर करण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यामध्ये याच प्रकारची अनियमीतता असण्याची शक्यता आहे.

5) रजा प्रवास सवलत देयका सोबत जोडलेल्या हॉटेल च्या बिलावर हॉटेल चा पूर्ण पत्ता पॅन सर्व्हीस टॅक्स नंबर, व्हॅट नंबर नमुद नाही. त्यामुळे पावती खरी आहे की नाही याबाबत चौकशी होणे जरुरी आहे.

6) वर नमुद 67 शाळेतील 214 कुटुंब ज्या तीन हॉटेल मध्ये थांबले त्या हॉटेलची प्रवासी थांबविण्याची क्षमता किती, खरोखर सर्व कुटुंब (शिक्षक व त्यांचे कुटुंब) त्या त्या हॉटेल मध्ये थांबले किंवा कसे याबाबत स्पष्टता होणे जरुरीचे आहे.

7) रजाप्रवास सवलत देयकासोबत जोडलेल्या प्रपत्रावर नियंत्रण अधिकारी याची स्वाक्षरी नाही.

8) चार वर्षाच्या एका गट वर्षात एकदा रजा प्रवास सवलत किंवा एकदा रजा प्रवास सवलत आणि एकदा स्वग्राम किंवा दोनदा स्वग्राम सवलत यापैकी कोणतेही एक विकल्पाद्वारे मंजुर करणे जरुरी आहे. तरी अशा प्रकारचा विकल्प घेण्याची किंवा रजा प्रवास सवलत घेण्याची सेवा पुस्तकात नोंद नाही.

9) वरील सर्व अनियमीतता पाहता सदर बाबीवर प्रशासकीय चौकशी होणे जरुरी वाटते.

**4.97 जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील इयत्ता 1 ली ते 4 थी मधील अनुसूचित जाती, जमातीच्या विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा योजनेतील अनियमितता.**

**पंचायत समिती आरमोरी, जिल्हा गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 17) -** सदरबाबत रक्कम रुपये 4,52,600/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) विद्यार्थ्यांना गणवेश अनुदान वितरणाबाबत नस्ती ठेवण्यात आलेली नाही. टिपणी न लिहीता सरळ बिलाव्दारे अनुदान शाळांना वाटप करण्यात आलेले आहे. त्यामुळे लाभार्थीची वस्तुस्थिती स्पष्ट होत नाही.

2) अनुदान वाटप बिलाचे दुय्यम प्रतिसह अनुदान वितरण आदेश शाळानिहाय विदयार्थ्यांची यादी व शाळांचे मागणीपत्र उपलब्ध नाही.

3) जिल्हा परिषद शाळांकडुन उपयोगिता प्रमाणपत्र तसेच विद्यार्थ्यांना गणवेशाची रक्कम प्राप्त झाल्याबाबत संबंधीत विद्यार्थी / पालकाचे स्वाक्षरीचे पोचपावती प्राप्त केली नाही.

**4.98 इयत्ता 1 ते 4 मधील मुलींना उपस्थिती भत्ता वाटपातील अनियमितता.**

**पंचायत समिती कोरची, जिल्हा गडचिरोली, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** सदरबाबत रक्कम रुपये 2,56,571/- खर्च नोंदविला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) शासन निणर्य क्रमांक पीआर ई-1051/9695/प्राशि-1, दिनांक 07/05/1991 अन्वये मुळ नोंदवहीवरुन केन्द्रप्रमुखांनी उपस्थिती भत्ता वाटप केलेबाबत विनियोग प्रमाणपत्र व उपस्थिती भत्ता वाटप केलेल्या विदयार्थिनींना रक्कम प्राप्त झाल्याबाबत स्वाक्षांकित पोचपावती शिक्षण विभागाकडे सादर करणे आवश्यक आहे. सदरचे विनियोग प्रमाणपत्र पोचपावती व उपयोगिता प्रमाणपत्र नस्ती उपलब्ध झालेले नाही.

2) लाभार्थी विदयार्थिनींचे पालकाचे नाव दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे यादीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र ग्रामसेवकाकडे अथवा तलाठी यांचेकडून होणे आवश्यक असताना तसे प्रामाणपत्र नस्ती उपलब्ध झालेले नाही.

3) गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कोरची गटशिक्षण अधिकारी, पंचायत समिती, कोरची यांनी अनुक्रमे 10 टक्के, 50 टक्के, व शिक्षण विस्तार अधिकारी यांनी 100 टक्के शासन भेटी देवुन प्रत्यक्षात विद्यार्थिनींना उपस्थिती भत्ता वाटप झाल्याबाबत तपासणी व पडताळणी करून त्याबाबतचे प्रमाणपत्र शिक्षण विभागास सादर करणे आवश्यक त्याप्रमाणे कार्यवाही केल्याचे आढळून आले नाही.

**4.99 शालेय पोषण आहार खिचडी शिजविणेसाठी प्रदानातील अनियमिततेबाबत.**

**पंचायत समिती सोनपेठ, जिल्हा परभणी, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 10) -** पंचायत समिती सोनपेठ सन 2015-2016 चे लेखापरीक्षणात शालेय पोषण आहार खिचडी शिजविणेसाठी प्रदान केलेल्या निवडक प्रमाणकांची तपासणी करण्यात आली. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्रमांक शापोआ-2010/प्रक्र.18/प्राशि-4, दिनांक 02/02/2011 व यापूर्वीचे शासन निर्णयानूसार ग्रामीण भागात शालेय पोषण आहार खिचडी शिजविणेसाठी महिला बचत गटांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. तथापि उपरोक्त प्रमाणकांचे प्रदानासंदर्भात रकमांचे वाटप तपासले असता सदरील प्रयोजनासाठी खाजगी व्यक्तींना प्रदान केल्याचे दिसून आले आहे. उक्त प्रदानांच्या संदर्भात बहू तांश शाळांच्या विदर्यांथ्यांचे उपस्थितीपट लेखापरीक्षणास सादर न केल्यामूळे प्रदान करण्यात आलेली रक्कम योग्य असल्याची पडताळणी करता आली नाही.

**4.100 शिक्षक समायोजन विलंबाने झालेबाबत.**

**पंचायत समिती जळकोट, जिल्हा लातूर, सन 2015-2016 (परिच्छेद क्रमांक 22)** - पंचायत समिती जळकोट अंतर्गत गट शिक्षणाधिकारी कार्यालय जळकोट सन 2015-2016 चे अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समायोजन बाबतची संचिका तपासताना याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

1) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक जि.प.व 511/प्र.क्र. 54/आ 4, दिनांक 18/05/2011 अन्वये दरवर्षी दिनांक 30 सप्टेंबर अखेर जिल्हा परिषदेतील शाळातील विद्यार्थ्यांची पटसंख्या निश्चित केल्यानंतर याआधारे अनुज्ञेय असलेल्या शिक्षकांच्या संख्येपेक्षा जादा प्राथमिक शिक्षकांच्या संख्येपेक्षा जादा प्राथमिक शिक्षकांच्या समायोजनाची बदल्या करण्याचे आदेश दिलेले आहेत.

2) उक्त शासन निर्णयात दिनांक 31/10/2013 पर्यंत समायोजनाची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश असताना दिनांक 13/08/2014 रोजी समायोजनाची प्रक्रिया तालुका स्तरावर वा जिल्हा स्तरावर पूर्ण झालेली आहे. अशी कार्यवाही विलंबाने होण्याचा बोध होत नाही. यामुळे आर्थिक वर्ष सन 2013-14 च्या लेखा परीक्षणात समायोजना अभावी दिनांक 01/11/2013 ते 28/02/2014 (तक्त्यात तपशिलात दर्शविल्या प्रमाणे ) तसेच ज्यांचे समायोजन दिनांक 13/08/2014 रोजी झाले आहे. त्या अतिरिक्त ठरलेल्या संबधीत प्राथमिक शिक्षक / प्राथमिक पदवीधर / मुख्याध्यापक यांचे वेतन लेखापरीक्षणात शासन अनुदानासाठी मान्य करता येत नाही.

3) गटशिक्षण अधिकारी जळकोट यांचे कावि-11/17, दिनांक 05/01/2017 नुसार अतिरिक्त शिक्षकाचे समायोजन दिनांक 05/01/2016 रोजी करण्यात आले असले बाबत शिक्षण अधिकारी यांना कळवण्यात आले. त्याच पत्रात श्री. मरतुळे पी.के. (हळद वाढवणा) व श्री. नायनेवाड व्ही.बी. (प्रा.श.कोन्हाळी) यांना जिल्हा स्तरावर समायोजनासाठी पाठवले बाबत संचिकेत पत्र नमूद आहे. परंतु सदर शिक्षक 30 सप्टेंबर च्या पट पडताळणी नुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या यादीत सबंधीताचे नावे नमूद नाहीत. असे असताना सबंधित शिक्षकांना जिल्हा स्तरावर समायोजन साठी का पाठवले याबाबत लेखापरीक्षणात कागदोपत्रा अभावी शहानिशा करता आली नाही. तरी याबाबतच्या अनुपालनात कागदोपत्री पूर्तता दर्शवावी.

4) आक्षेपातील तक्त्यातील तपशील या रकाण्यात अतिरिक्त यादी नुसार असे लिहिलेल्या शिक्षक कर्मचारी हे 2013 च्या पटपडताळणी नुसार अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या यादीत आहेत. यांचे काय झाले याबाबत कागदोपत्री शहानिशा करून झालेल्या प्रदानाची (कर्तव्यावर नसताना आहरणकेलेल्या रक्कमेची) सबंधीत जबाबदार प्राधिकाराकडून वसुली करावी.